cmyk

## संपादकीय

### राजकिय चिखलफेक नुकसानकारकच

राजकारणात साधनशुचितेचा लोप होत आहे. मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार वाढला आहे. यामुळे देशाची हानी होत आहे, अशी भूमिका घेत आम आदमी पक्षाने आपल्या राजकारणाचा प्रारंभ केला. तथापि, आज हा पक्ष याच जंजाळात अडकलेला दिसून येतो. या पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांना दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संस्थापक सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्या अधिकृत निवासस्थानामध्ये मारहाण होण्याचे प्रकरण सध्या गाजत आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### दिल्ली बेबी केअर सेंटर दुर्घटना रुग्णालयाच्या मालकाला अटक

नवी दिल्लीः पूर्व दिल्लीतील विवेक विहार येथील बेबी केअर सेंटरला शनिवारी (दि.२५) भीषण आग लागली. या आगीत ६ मुलांचा होरपळून मृत्यू झाला. या घटनेनंतर या रुग्णालयाचा संचालक व मालक डॉ.नवीन हा फरारी होता. त्याला रविवारी (दि.२६) दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. या केअर सेंटरमध्ये अडकलेल्यापैकी १२ मुलांची सुटका करण्यात आली. त्यातील ६ मुलांचा होरपळून मृत्यू झाला. तर सहा मुलांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बेबी केअर सेंटरच्या शेजारी एक इमारत होती, तीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. मात्र सुदैवाने तेथे कोणतीही जीवितहानी झाली नाही.


बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-४६ | सोमवार दि.२७ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


# पाण्यासाठी आंदोलन करणारे शेतकरी पोलिसांच्या ताब्यात

## » मलाही तुरुंगात टाका म्हणत रोहित पाटलांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

**तासगाव । प्रतिनिधी**

**सावळज, सिद्धेवाडी व परिसरातील शेतकऱ्यांनी पाण्यासाठी आंदोलन केले आहे. शेतकरी गुन्हेगार नाहीत. पाण्यासाठी आंदोलन केल्यावर गुन्हे दाखल होत असतील, तर यापुढे कोणीच पाण्यासाठी आंदोलन करणार नाही. जर शेतकऱ्यांवर आंदोलन केले म्हणून गुन्हे दाखल करणार असाल, तर माझ्यावरही गुन्हा दाखल करा. शेतकऱ्यांबरोबर मलाही तुरुंगात टाका, अशी आक्रमक भूमिका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे युवा नेते रोहित पाटील यांनी घेतली. जोपर्यंत ताब्यात घेतलेल्या शेतकऱ्यांना सोडत नाही, तोपर्यंत पोलीस ठाण्यातून हलणार नाही, अशी भुमिका घेत पाटील यांनी पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांच्या केबिनमध्ये सुमारे तीन तास ठिय्या मांडला.**





शनिवारी विसापूर योजनेचे पाणी सावळज भागात सोडण्यात आले होते. मात्र, काही तासांतच हे पाणी बंद करण्यात आले. एका नेत्याच्या सांगण्यावरून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी बंद करण्याचे पाप केले आहे, असा आरोप करून शेतकऱ्यांनी बिरणवाडी फाट्यावर रविवारी (दि.२६) रास्ता रोको केला. सुमारे दोन तासांहून अधिक काळ हा रस्ता रोको चालला. त्यामुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होत गेली. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर करून अनेक आंदोलकांना जबरदस्तीने ताब्यात घेतले. या आंदोलकांना पोलीस ठाण्यात आणून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. पोलिसांची ही दडपशाही कानावर येतात रोहित पाटील यांनी तातडीने तासगाव पोलीस ठाण्यात धाव घेतली. या ठिकाणी पाटील यांनी आंदोलक शेतकऱ्यांची भेट घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांच्या केबिनमध्ये रोहित पाटील यांच्यासह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या मांडला.

◀◀ पान २ वर

### एका नेत्याच्या सांगण्यावरून पाणी थांबविले

पुणदी योजनेचे पाणी सावळजला सोडण्यात आले होते. मात्र एका नेत्याच्या सांगण्यावरून अवघ्या काही तासात हे पाणी बंद करण्यात आले. त्यामुळे सावळज भागातील शेतकरी संतप्त झाले आहेत. पाण्याच्या बाबतीत राजकारण केले जात आहे. अधिकारी नेत्यांच्या सांगण्यावरून पाणी बंद करत आहेत. पाण्याच्या बाबतीत केले जाणारे राजकारण खपवून घेणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

### विनंती करून पाणी मिळेना म्हणून आंदोलन

शेतकऱ्यांनी पाण्यासाठी आंदोलन केले आहे. सावळज भागात पाण्याची भीषण टंचाई आहे. पिण्यासही पाणी नाही. पाटबंधारे विभागाकडे गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून पाण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. अनेक निवेदने दिली आहेत. मात्र, या विभागाकडून वंचित गावांना पाणी देण्याचे नियोजन केले जात नाही. त्यामुळे स्वाभाविकपणे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी रास्ता रोको केला.

# धारूरमध्ये अनेक गावांना वादळी वाऱ्याचा फटका



**धारूर। प्रतिनिधी**

**मागील चार ते पाच दिवसापासून सायंकाळच्या वेळी वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी सुरू आहे . पावसातील वाऱ्यामुळे अनेक झाडे उन्मळून पडणे तसेच घरावरील पत्रे उडण्याचे प्रकार घडत आहेत .या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

धारूर तालुक्यातील घागरवाडा येथे अवकाळी पाऊस व विज पडल्यामुळे शेतकऱ्याच्या घरातील साहित्य जळून खाक झाले आज दुपारी वादळी पावसामुळे घागरवाडा येथील शेतकरी अशोक महादेव नागरगोजे यांच्या घरात आग लागून घरातील ◀◀ पान २ वर

# सहाव्या टप्प्यात इंडिया आघाडीने २७२ जागांचा आकडा गाठला

## काँग्रेसने केला दावा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्याचे मतदान झाले असून आता सातव्या आणि अखेरच्या टप्प्याचे मतदान होणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी मतमोजणी आहे. सहाव्या टप्प्यात इंडिया आघाडीने २७२ जागांचा आकडा गाठला असून, आता भाजपाचा पराभव होऊन सत्तेतून जाणे निश्चित आहे असा मोठा दावा काँग्रेसकडून करण्यात आला आहे.**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी एक्सवर एक पोस्ट करत सदर दावा केला आहे. लोकसभा निवडणुकीचा सहावा टप्पा झाला. आतापर्यंत ४८६ जागांवर मतदान झाले आहे. आता, पंतप्रधानांनी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या योजनांवर विचार सुरू केला आहे. लोकसभा निवडणुकीसाठी परिस्थिती अगदी स्पष्ट आहे. भाजपाचे जाणे निश्चित झाले असून दक्षिणेत त्यांचा सुफडा साफ होत आहे. उत्तर, पश्चिम आणि पूर्वेतून ते निम्मे होत आहेत, असा दावा जयराम रमेश यांनी केला आहे.

पहिल्या टप्प्यापासून इंडिया आघाडीला मिळणारा जनाधार सतत बळकट होत आहे. महाराष्ट्र, यूपी, बिहार आणि दिल्लीत मतदान झाल्यानंतर आघाडीच्या घटक पक्षातील अविश्वसनीय केमिस्ट्री आपण पाहत आहोत. इंडिया आघाडीने आधीच २७२ जागांचा टप्पा ओलांडला आहे आणि एकूण ३५० पेक्षा जास्त जागा जिंकण्याच्या मार्गावर आहे. मावळत्या पंतप्रधानांचा विश्वासघात ◀◀ पान २ वर

### निवडणूक आयोग झोपेतच

निवडणूक आयोग झोपेतच आहे, हे दुर्दैव आहे. मावळत्या पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली भाजपा दररोज आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करत आहे. मतदानात धार्मिक चिन्हांचा वापर, मतदानाच्या दिवशी जाहिराती, भाजप कार्यकर्त्यांचे मतदानाचे व्हीडीओ सोशल मीडियावर वारंवार पोस्ट करणे या सर्वांनी निवडणूक आयोगाच्या मावळत्या पंतप्रधानांना जबाबदार धरण्याच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

# लष्कर प्रमुख मनोज पांडे यांना एक महिन्याची मुदतवाढ

## मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीचा निर्णय



**नवी दिल्ली। वृतसंस्था**

**सध्या लोकसभा निवडणूकीचे वारे देशात वाहत असतानाच लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे हे ३१ मे रोजी अर्थात त्यांचा निवृत्तीचा दिवस असताना अचानक दिल्लीत घडामोडी घडत मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेनंतर ३० जून २०२४ पर्यंत अर्थात एक महिन्याची मुदतवाढ दिली.**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने रविवारी लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांचा कार्यकाळ एक महिन्यासाठी वाढवला. यापूर्वी १९७५ साली इंदिरा गांधी यांनी त्यावेळचे लष्करप्रमुख जी जी बेवूर हे निवृत्त होत होते. मात्र इंदिरा गांधी यांनी बेवूर यांची सेवा एक वर्षांनी वाढविली. जनरल पांडे २५ महिन्यांच्या कार्यकाळानंतर ◀◀ पान २ वर

# शाळांमध्ये मनुस्मृतीचे श्लोक घेतले जाणार नाहीत

## शिक्षण मंत्री केसरकर यांचे रामदास आठवले यांना आश्वासन

**मुंबई । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोकांचा समावेश करण्यास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी विरोध केला आहे. याबाबत रामदास आठवले यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात घेण्याबाबत तीव्र विरोध दर्शविला. यावेळी दोघांमध्ये झालेल्या चर्चेत दीपक केसरकर यांनी शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक येणार नसल्याचे ठोस आश्वासन रामदास आठवले यांना दिले आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेण्याच्या विषयाला पूर्णविराम मिळालेला आहे, अशी माहिती रामदास आठवले यांच्यावतीने जारी करण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले आहे. जातीभेद, विषमता आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या भेदभावाच्या अनेक बाबी मनुस्मृतिमध्ये असल्यामुळे मानवतेच्या हक्कासाठी, विषमता आणि जातीभेदाच्या अमानुष रूढी परंपरे विरुद्ध संगर म्हणून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे मनुस्मृती चे दहन करून सामाजिक क्राती केली. त्यामुळे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाळलेल्या मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात ◀◀ पान २ वर

# अज्ञात वाहनाच्या धडकेत २ जागीच ठार

**परळी । प्रतिनिधी**

**औष्णिक वीज निर्मिती केंद्राजवळील उड्डाणपूला जवळील चेंबरी रेस्ट हाऊस जवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत २ इसमाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार बरकत नगर येथील रहिवासी असलेले सय्यद अब्दुल गफ्फार (वय ६०) व अजय जमुना चौधरी (वय ४५) हे आपल्या मोटारसायकल वरून परळीकडे येत असताना औष्णिक वीज निर्मिती केंद्र परिसरात असलेल्या उड्डाणपूलाजवळ आले असता अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली.या धडकेत दोन्ही इसम वाहनाच्या मागच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती कळताच परळी उपजिल्हा रूग्णालयाची १०८ रुग्णवाहिका व डॉ.अमोल चाटे यांनी घटना स्थळी धाव घेऊन मयताना परळी उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल केले.

# भ्रष्टाचारी खेकड्याकडून आता अधिकाऱ्यांनाही नांग्या मारण्यास सुरुवात

## रोहित पवारांचा मुख्यमंत्र्यांसह आरोग्यमंत्र्यांवर हल्लाबोल; डॉ. पवारांच्या पत्र्यावरुन घेरले

**पुणे । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना लिहिलेल्या पत्रावर आता राजकीय प्रतिक्रिया उमट असतानाच शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी थेट आरोग्यमंत्र्यांवर निशाणा साधला आहे. साडेसहा हजार कोटी रुपयांच्या दलालीचा उल्लेख करत रोहित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनाच थेट सवाल केला आहे.**





महिला कर्मचाऱ्याचा लैंगिक छळ प्रकरणी आणि विभागातंर्गत आर्थिक घोटाळ्याचा ठपका ठेवत राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाने पुणे जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांना निलंबित केलं आहे. निलंबित पवार यांची बदली नंदुरबारच्या जिल्हा रुग्णालयात करण्यात आली आहे. निलंबनाच्या कारवाईनंतर पवार यांनीएक पत्र लिहित खळबळजनक गौप्यस्फोट केले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव आणि अप्पर मुख्य सचिव यांचा उल्लेख करत लिहिलेल्या पत्रामध्ये, मंत्री महोदयांनी मला कात्रज कार्यालयात बोलावून नियम बाह्य ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू : १२.५० क्विंटल | | |
| २,३१० | २,५२५ | २,४४५ |
| ज्वारी/हायब्रिड : ८१.०० क्विंटल | | |
| १,८२५ | ३,२९१ | २,४८८ |
| मूग : १.५० क्विंटल | | |
| ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : ६.०० क्विंटल | | |
| १०,४०० | ११,८०१ | ११,१०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | | |
| ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: २५.५० क्विंटल | | |
| २,२५० | २,७०० | २,४५० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | | |
| १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:१८.५० क्विंटल | | |
| ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | | |
| ५,५०१ | ६,३०० | ५,९६७ |

# ट्रॅफिक ते गॅस सिलिंडरचे जून महिन्यापासून बदलणार हे नियम


## नागरीकांच्या खिशाला लागणार कात्री; जाणून घ्या होणारे बदल



**मुंबई । प्रतिनिधी**

**मे महिना संपायला अवघे काही दिवस शिल्लक आहे. मे महिन्यानंतर आता जून महिना लागणार आहे. नव्या महिन्याच्या पहिल्याच दिवसापासून अनेक नियम बदलणार आहेत. या बदलांकडे लक्ष न दिल्यास तुमच्या खिशाला कात्री लागू शकते. येत्या १ जूनपासून घरगुती तसेच व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात बदल होणार आहे. यासह वाहतुकीच्या नियमातही अनेक बदल होणार आहेत. याच पार्श्वभूमीवर बदललेले हे नियम काय आहेत? यासह अन्य कोणकोणत्या नियमांत बदल झाला आहेत.**

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात बदल होत असतो. या दिवशी देशातील ऑईल मार्केटिंग कंपन्या या गॅस सिलिंडरच्या किमती ठरवत असतात. बदललेला हा दर प्रत्येक महिन्याच्या एका तारखेपासून लागू होतो. त्यामुळे येत्या एक जूनपासून गॅस सिलिंडरच्या दरात बदल होणार आहे. याआधी ९ मार्च रोजी घरगुती गॅस सिलिंडरचे दर कमी झाले होते. व्यावसायिक गॅसदेखील एप्रिल महिन्यात स्वस्त झाला होता. त्यामुळे जून महिन्यात गॅस सिलिंडरची किंमत कमी होणार की वाढणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



### वाहतुकीच्या नियमात आणखी मोठे बदल

येत्या १ जूनपासून वाहतुकीच्या नियमात मोठे बदल होणार आहेत. कोणत्याही व्यक्तीने या नियमांचे उल्लंघन केल्यास त्याच्याकडून मोठा दंड आकारला जाऊ शकतो. वेगाची मर्यादा ओलांडत एखाद्या व्यक्तीने गाडी चावल्यास २००० रुपयांचा दंड भरावा लागू शकतो. हा दंड अगोदर एक हजार रुपये होता. लायसन्स नसताना गाडी चालवल्यास ५०० रुपयांचा दंड भरावा लागू शकतो. हेल्मेट नसताना किंवा सिट बेल्ट नसताना गाडी चालवल्यास संबंधित व्यक्तीला १०० रुपयांचा दंड भरावा लागणार आहे.

### आधारमध्ये बदल करण्यासाठीच्या मुदतीत वाढ

यूआयडीएआयच्या एका निर्णयामुळे सामान्य लोकांना दिलासा मिळाला आहे. कारण यूआयडीएआयने आधारमध्ये मोफत बदल करण्याची मुदत १४ केली आहे. म्हणजेच आता १४ जूनपर्यंत सामान्य लोकांना कोणतेही अतिरिक्त शुल्क न देता आधार कार्डमध्ये बदल करता येईल. आधार सेंटरवर जाऊन आधार कार्डमध्ये बदल करायचा असल्यास प्रत्येक अपडेटसाठी ५० रुपये द्यावे लागतील.

### ...तर भरावा लागणार २५ हजारांचा दंड

येत्या जून महिन्यात वाहतुकीच्या अनेक नियमांत बदल करण्यात येणार आहे. कोणताही अल्पवयीन मुलगा गाडी चालवताना दिसल्यास त्याच्या पालकांकडून मोठा दंड आकारला जाणार आहे. हा दंड २५ हजार रुपयांपर्यंत असू शकतो. विशेष म्हणजे २५ वर्षांपर्यंत लायसन्स देण्यात येणार नाही.

cmyk

अग्रलेख

# राजकिय चिखलफेक नुकसानकारकच

राजकारणात साधनशुचितेचा लोप होत आहे. मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार वाढला आहे. यामुळे देशाची हानी होत आहे, अशी भूमिका घेत आम आदमी पक्षाने आपल्या राजकारणाचा प्रारंभ केला. तथापि, आज हा पक्ष याच जंजाळात अडकलेला दिसून येतो. या पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांना दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संस्थापक सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्या अधिकृत निवासस्थानामध्ये मारहाण होण्याचे प्रकरण सध्या गाजत आहे. स्वाती मालीवाल यांनी नवे आरोप करताना रविवारी सांगितले की, मला आता बलात्कार अणि जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत.

स्वाती मालीवाल यांची नियुक्ती स्वत: केजरीवाल यांनी राज्यसभेवर केली होती. मात्र, आज त्यांना पक्षाने वाऱ्यावर सोडून दिल्याचे दिसून येते. केजरीवाल यांचे स्वीय सहाय्य विभव कुमार यांच्यावर मालीवाल यांना मारहाण केल्याचा आरोप असून ते सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत. मात्र, हे भारतीय जनता पक्षाचेच कारस्थान आहे, असा आरोप आम आदमी पक्षाने केला. दुसरीकडे मालीवाल यांनी आपल्याच पक्षाच्या नेत्यांविरोधात पोलिसांमध्ये तक्रार केली असून, त्यांनी प्रत्यक्ष केजरीवाल यांच्याकडेही बोट दाखविले आहे. हे प्रकरण या पक्षातील अंतर्गत आहे. त्याचा भारतीय जनता पक्षाशी संबंध काय? असा प्रश्न कोणाच्याही मनात येणे स्वाभाविक आहे. अगोदरच, मद्यधोरण घोटाळा प्रकरणात आम आदमी पक्षाची पुरेवाट झाली आहे. प्रत्यक्ष केजरीवाल यांच्यावर कारागृहात राहण्याची वेळ आली. त्यांना प्रचारापासून रोखण्यासाठी हे कारस्थान सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने केले, असा जरी आरोप आम आदमी पक्षाचा असला, तरी जामीन देणे किंवा न देणे हे कोणत्याही राजकीय पक्षाच्या हाती नसते. तर ते स्पष्टपणे न्यायालयाच्या हाती असते. केजरीवाल सध्या सशर्त जामीनावर बाहेर आहेत. मात्र, जामीन केवळ प्रचारासाठी आणि तेव्हढ्यापुरताच देण्यात आला आहे. मतदानाचा अंतिम टप्पा संपताच २ जूनला, म्हणजेच लोकसभा निवडणुकीच्या मतगणनेची वाटही न पाहता त्यांना कारागृहात पुन्हा जावे लागणार आहे. हे प्रकरण सुरु असतानाच, त्यात मालीवाल प्रकरणाची भर पडली. या प्रकरणातील सत्य काहीही असले तरी त्यामुळे पक्षाची आणि केजरीवाल यांची स्वत:ची प्रतिमा मलीन झाली, ही बाब नाकारता येत नाही. मालीवाल यांना मारहाण झाल्याची बाब या पक्षाचे नेते संजयसिंग यांनी स्वत: स्पष्टपणे आणि उघडपणे मान्य केली होती. तसेच विभव कुमार यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असेही प्रतिपादन त्यांनी केले होते. नंतर मात्र, संजय सिंग आणि आम आदमी पक्ष यांनी यु टर्न घेत विभव कुमार निर्दोष असल्याचा निर्वाळा दिल्याने परिस्थिती अधिक चिघळली आहे. मालीवाल यांचा वैद्यकीय अहवालही त्यांना जखमा झाल्याचे नमूद करतो. मग या जखमा त्यांनी स्वत:च स्वत:ला करुन घेतल्या, असे म्हणायचे काय, असाही प्रश्न आहे. आणि हे सर्व कशासाठी, तर स्वत:च्याच पक्षाला अडचणीत आणण्यासाठी? पक्ष नेतृत्वाशी त्यांचे पटत नव्हते अशी स्थिती असेल तर त्या पक्ष सोडू शकल्या असत्या. किंवा पक्षाने स्वत: त्यांना निलंबित केले असते. आजवर अनेक मान्यवर आम आदमी पक्ष सोडून गेलेले आहेत. त्यांच्यामध्ये प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, अशुतोष पांडे, कवी कुमार विश्वास आदी लोकांनी हा पक्ष सोडला आहे. त्यांच्यापैकी काहींनी पक्ष सोडताना केजरीवाल हे एकाधिकारशाही गाजवतात असा आरोपही केला आहे. मालीवाल या सुद्धा अशा प्रकारे पक्ष सोडू शकल्या असत्या. पण पक्ष सोडण्याची त्यांची इच्छा त्यांनी कधीही व्यक्त केली नव्हती. किंवा पक्षनेतृत्वासंबंधी त्यांच्या तक्रारी आहेत, असे पक्षाकडून किंवा त्यांच्याकडून केव्हाही सूचित करण्यात आल्याचे प्रसिद्ध झालेले नाही. त्यांनी मारहाणीचा आरोप केल्यानंतरच हे आरोप-प्रत्यारोपांचे मोहोळ उठले आहे. याचाच अर्थ असा की, केजरीवाल, त्यांचा स्वीय सहाय्य विभव कुमार किंवा आम आदमी पक्ष यांची बाजू पूर्णपणे योग्य आहे असे म्हणता येत नाही. या प्रकरणाची चौकशी होणे आणि सत्य बाहेर येणे हे त्यासाठीच आवश्यक आहे. सध्या ही चौकशी सुरु आहे आणि ती पूर्ण झाल्यानंतरच काय ते समजून येईल.

केजरीवाल यांनी जेव्हा राजकारणाचा प्रारंभ केला, तेव्हा त्यांनी अनेक पक्षांच्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप उघडपणे नावे घेऊन केले होते. नंतर या नेत्यांची क्षमायाचना करण्याची वेळ त्यांच्यावर आली. कारण आरोप नुसता करुन चालत नाही. त्याचा पुरावाही असावा लागतो. विरोधी पक्षांच्या आघाडीत केजरीवाल यांचा पक्ष समाविष्ट आहे. याच आघाडीतील नेत्यांवर त्यांनी पूर्वी आरोप केले होते. त्यामुळे केजरीवाल हे स्वत:ही अन्य राजकारण्यांप्रमाणेच आहेत, हे त्यातून स्पष्ट होते. आपल्याच पक्षाची, आपणच निवडलेली खासदार महिला, असे गंभीर आरोप करत आहे, याचा त्यांनी तितक्याच गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा, त्यांची विश्वासार्हता धोक्यात येण्याची शक्यता आहे. सध्याच्या काळात राजकारण अत्यंत स्पर्धात्मक झाले आहे. अशावेळी स्वत:ची बाजू भक्कम ठेवणे आणि स्वत:च्या पक्षात काही गैरप्रकार घडत असतील, तर ते घडू न देणे, हे महत्त्वाचे आहे. प्रत्येक वेळी दुसऱ्यांवर आरोप करण्यातून काहीही साध्य होणार नाही. केवळ आम आदमी पक्ष नव्हे, तर सर्वच पक्षांनी हे पथ्य पाळण्याची गरज आहे.

# विजयश्री मिसाळ यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान

**मादळमोही । प्रतिनिधी**

**शैक्षणिक क्षेत्रातील कार्यरत असलेली शिक्षक फाउंडेशन द्वारा आयोजित महाराष्ट्र शिक्षक पॅनल चा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार सोहळा दि. २४ मे रोजी नाशिक येथे संपन्न झाला यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री किशोर शहाणे मित्र वनव्या मध्ये गारव्यासारखा फेम कवी अनंत राऊत तसेच महाराष्ट्र शिक्षक पॅनलचे राज्य अध्यक्ष दीपक चामे राज्य समन्वयक गिरीश दारुंटे सतीश कोळी मेघा राणी जोशी यांच्या हस्ते विजयश्री दराडे मिसाळ यांना दुसऱ्यांदा हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.**




व्हॅली व्ह्यू इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या दराडे मिसाळ ह्या गेल्या वीस वर्षापासून शिक्षण क्षेत्रात काम करत असून आतापर्यंत वेगवेगळ्या दहा राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. ग्रामीण भागात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुरू केलेले व्हॅली व्ह्यू इंटरनॅशनल स्कूल हे बीड जिल्ह्याचे रोल मॉडेल झाले आहे. मुलांची प्रगती व पालकांचे समाधान ही शाळेची ओळख दूरवर पसरली आहे. विज्ञान व सामाजिक शास्त्र विषयांमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेद्वारे शाळेमध्ये तयारी करून घेतली जाते. विविध क्रीडा प्रकार व स्पर्धा परीक्षांमध्ये शाळेने राष्ट्र पातळीपर्यंत नाव केले आहे. याचे सर्व श्रेय शाळेच्या चालक व मालक असणाऱ्या विजयश्री दराडे यांना जाते. त्यांचे पती अँड. विकास मिसाळ यांची त्यांना खंबीर साथ असते. या शाळेला विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी झाल्या असून विविध शाळा देखील प्रत्यक्ष भेट देऊन शाळेचे कौतुक करतात. शाळेला दोन वेळा राज्यस्तरीय आदर्श व कृतिशील युक्त शाळा असे पुरस्कार मिळाले असून ग्रामीण भागात शिक्षणासाठी झटणाऱ्या या दांपत्याचे कौतुक पंचक्रोशीत होते. प्रामाणिक प्रयत्न व सातत्य हेच माझ्या यशाचे श्रेय आहे असे प्राचार्य विजयश्री दराडे मिसाळ यांनी बोलताना सांगितले. त्यांच्या कामगिरी बद्दल पालक व शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# माहेश्वरी प्रगती मंडळ बीडचा अनोखा प्रकल्प

## अमरधाम मोंढा येथील विसावा ओट्याचे लोकार्पण

**बीड । प्रतिनिधी**

**नगर परिषद बीडद्वारे अत्यंत सुसज्ज असे शहराच्या मध्यवर्ती असलेले अमरधाम मोंढा रोड येथे बांधण्यात आले असून येथे मनुष्य जीवनाची अंतिम यात्रा संपते . येथील अमरधाम मध्ये माहेश्वरी प्रगती मंडळाने मागील काळात पंखे, माईक सिस्टीम, भजन रेकॉर्डिंग तसेच दोन भव्य अस्थी लॉकरची ( काही मर्यादित दिवसासाठी विसर्जन करेपर्यंत पवित्र अस्थी सुरक्षित ठेवण्यासाठी बँक सारखे लॉकर) व्यवस्था केलेली आहे.**



परंतु मागील सप्ताहात एका सहकारी यात्रीची अंत्ययात्रा अमरधामेत आलेली असताना सदरहू शव हे पायरीवरून घसरले असताना उपस्थित सकल सामाजिक लोकांनी अंत्ययात्रा आल्यानंतर दिवंगत आत्म्याला अखेरचा निरोप (मुखाग्नी) देईपर्यंत त्या प्रेताला विसावा ओटा असावा अशी संकल्पना पुढे आली त्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या माहेश्वरी प्रगती मंडळाचे माजी अध्यक्ष श्री.विष्णुदास बियाणी, निर्वाचित अध्यक्ष सुरेंद्र कासट व मंडळाचे जेष्ठ सदस्य तथा राजस्थानी समाज सेवाचे अध्यक्ष विष्णुदास तापडिया यांनी या संकल्पनेला तात्काळ मूर्तस्वरूप देण्याचे ठरवले. त्यांना सुरज लाहोटी यांनी फरशी व ग्रॅनाईट देऊन व राजेंद्रजी चरखा, बद्रीनाथ मानधने यांच्या विशेष पुढाकाराने व माहेश्वरी प्रगती मंडळाच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने अमरधाम येथे सुसज्ज अशा''शव विसावा ओटा'' तयार करण्यात आला त्यांचे लोकार्पण देखील झाले. येथील विसावा ओट्यावर तयार झाल्यापासून अनेक दिवंगत पार्थिव देहास काही काळ विसावा घेऊन अंतिम मुखाग्नीसाठी नेण्यात आले.अंतिम दर्शनासाठी सदरहू विसावा ओटा अत्यंत उपयुक्त असल्याचे अनेक सकल समाजाकडून व्यक्त करण्यात आले. या अनोख्या ऊपयुक्त अशा मंडळाच्या उपक्रमाची अनेक समाजसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशंसोद्गार काढले. माहेश्वरी प्रगती मंडळ,बीड अनेक सकल समाज उपयोगी प्रकल्प मागील अनेक वर्षांपासून हाती घेत आहे. या कामी मंडळाचे माजी अध्यक्ष प्रमोद मणीयार , माजी अध्यक्ष अमर डागा तसेच सामाजिक संस्थेचे बद्रीनारायणजी गिलडा, तालुका सभेचे सचिव मयुरजी कासट यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.

# बलात्कारासह जीवे मारण्याच्या धमक्या – स्वाती मालीवाल

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



**मला बलात्कार आणि जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत, असा दावा आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांनी आज (दि.२६) केला. यूट्यूबर ध्रुव राठीने मारहाण प्रकरणी एकतर्फी प्रतिक्रियेचा व्हिडिओ केला असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.**

आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल मारहाण प्रकरणानंतर चर्चेत आल्या आहेत. ''आम आदमी पक्षाने माझे चरित्रहनन करण्याचा प्रयत्न केला. असा दावा मालीवाल यांनी केला होता. आता बलात्कार आणि जीवे मारण्याच्या दिल्या जात आहेत. असा दावा त्यांनी 'एक्स' वर काही स्क्रीनशॉट पोस्ट करत मालीवाल यांनी केला आहे.'' या पोस्टमध्ये मालीवाल यांनी शेअर केलेल्या स्क्रीनशॉटमध्ये त्यांना धमकी दिल्याचे दिसत आहे. याप्रकरणी दिल्ली पोलिसांकडे तक्रार केली असून ते तपास करतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# अवैध हातभट्टी दारू विक्रीची दुकाने बंद व्हावी; नागरिकांची बैठक

## संभाजीनगर व शहर पोलीस ठाणे येथील फौजदारांची घेतली शिष्टमंडळाने भेट

**परळी । प्रतिनिधी**

कालरात्री देवी मंदिर परिसरा असलेल्या साठेनगर, भिमनगर या भागात खुले आम, पोलिसांच्या नाकावर टिचुन, राजरोस पणे, मोठ्या प्रमाणात अवैध्य हातभट्टी दारू विक्रीचा व्यवसाय सुरू असून दहा ते पंधरा जण हा व्यवसाय करतात, या सर्वांची नावे व पत्ते देण्यात आला. या भागातील तरुण स्वस्तातली हातभट्टी दारू पिऊन व्यसनाधीन झाला आहे, यामुळे त्याला अनेक आजार होत आहे, अनेक तरुणांचे संसार उध्वस्त झाले आहे, व्यसनाधीनते मुळे



तरुणांच्या मृत्यूचे प्रमाण देखील वाढले आहे, या अवैद्य हातभट्टी दारू विक्रेत्यांचा बंदोबस्त व्हावा यासाठी येथील या भागातील सुजाण नागरिकांनी पुढाकार घेऊन जिजामाता उद्यान येथे व्यापक बैठक घेतली. बैठकीमध्ये विचार विनिमय करून, सर्वानुमते तात्काळ हातभट्टी अवैध दारू विक्री करणाऱ्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी समोर आली. दुपारी ही बैठक पार पडल्यानंतर सायंकाळी सर्वानुमते शिष्टमंडळ परळी शहर पोलीस ठाणे, संभाजीनगर पोलीस ठाणे यांच्या भेटीसाठी गेले व त्यांनी सविस्तरपणे या भागात होणाऱ्या अवैध हातभट्टी दारू विक्रीची सविस्तर माहिती दिली,पोलीस प्रशासनाने यावर कडक, प्रतिबंधक कारवाई करू असे आश्वासन दिले आहे. पोलीस पेट्रोलिंग देखील वाढवण्यात येणार असल्याची माहिती सांगितली आहे.

साठेनगर,भिमनगर, कालरात्री देवी मंदिर परिसर या ठिकाणच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सर्व पक्षीय नेते मंडळींनी केले. त्यामध्ये माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, पीआरपीचे नेते सोपान ताटे, वंचित बहुजन आघाडीचे बालाजी जगतकर, भाजपा नेते रमेश गायकवाड,राष्ट्रवादीचे नितीन रोडे, संतोष आदोडे,प्रताप समिंदरसवळे,राज जगतकर, अँड.अर्जून सोळंके,भैय्यासाहेब आदोडे,निलेश वाघमारे,अभिजित कांबळे,जतिन जगतकर, अनंत कांबळे, बबलु साळवे, किरण तरकसे,अतुल आवचारे,साहेबराव कस्बे,महेश मस्के आदी उपस्थित होते.

# गेवराईत आज 'श्री स्वामी समर्थ' यांच्या पालखीचे आगमन

## स्वामी भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे

**गेवराई । प्रतिनिधी**

**शहरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही अन्न छत्र मंडळ अक्कलकोट श्री. स्वामी समर्थ यांच्या पालखीचे आगमन आज सोमवार, दि.२७ मे २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई येथील वाणी मंगल कार्यालय जायकवाडी वसाहत गेवराई येथे होत आहे. तरी भक्तगण मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पालखी संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.**

गेवराई शहरातील वाणी मंगल कार्यालय, जायकवाडी वसाहत गेवराई येथे सायंकाळी



ठिक ६ वाजता स्वामींच्या पालखीचे आगमन होईल तदनंतर संध्याकाळी ७.३० वाजता आरती व नंतर आठ ते दहा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी सर्व स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री. स्वामी समर्थ पालखी संयोजक सदस्य संदीप राजगुरु, अविनाश कुलकर्णी, राजेंद्र सिकची, संदीप सिकची, . अनंत वडघणे, श्रीपाद रामदासी, सुधीर जोशी, राहुल पाठक, अनंत वडघणे, गोपाल लखोटिया यांनी केले आहे.

# गर्दीमुळे माउंट एव्हरेस्टवरील बर्फाचा काही भाग कोसळला

**काठमांडू । वृतसंस्था**

**जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्टवर जाम झाला आहे. एकत्रितपणे २०० गिर्यारोहकांनी ८७९० मीटर उंचीवर दक्षिण शिखर आणि हिलरी स्टेप गाठले. ८,८४८ मीटर उंच माउंट एव्हरेस्ट येथून २०० फूट दूर आहे. गर्दी जमल्याने येथे बर्फाचा काही भाग तुटला.**



यावेळी ६ गिर्यारोहक तिथे अडकले. मात्र, यातील ४ जण दोरीच्या साहाय्याने परत वर येण्यात यशस्वी झाले. दोन गिर्यारोहक (एक ब्रिटिश आणि एक नेपाळी) हजारो फूट खाली पडले आणि बर्फात गाडले गेले. ही घटना २१ मे रोजी घडली होती, ज्याचा व्हीडीओ आता समोर आला आहे. चार दिवसांपासून बर्फात अडकल्याने दोन्ही गिर्यारोहकांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त होत आहे. नेपाळच्या पर्यटन अधिका-यांनी सांगितले की, हे दोघेही एव्हरेस्टवर चढणा-या १५ गिर्यारोहकांच्या गटातील होते. जेव्हा बर्फाचा काही भाग तुटला तेव्हा ते दक्षिण शिखराच्या दिशेने पडले. याला टेकडीचा डेथ झोन म्हणतात, जिथे ऑक्सिजनची पातळी खूप कमी असते. साहसी कंपनी ८ के ने सांगितले की, बचावकर्ते दोन गिर्यारोहकांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आता त्यांच्या जगण्याची शक्यता खूपच कमी झाली आहे. चढाईचे नेतृत्व करणा-या कंपनीने सांगितले की, हिलरी स्टेपवरून बर्फाचा तुकडा खाली पडला होता. तो शिखराजवळील बर्फाचा उभा भाग होता. येथून दोन्ही गिर्यारोहक तिबेटच्या दिशेने पडले.

# पान १वरून...

### पाण्यासाठी आंदोलन करणारे

दरम्यान, सामान्य लोकांना रास्ता रोकोमुळे नाहक त्रास सहन करावा लागला आहे. या रास्ता रोकोची माहिती वरिष्ठांपर्यंत गेली आहे. त्यामुळे माझा नाईलाज आहे. मला आंदोलकांवरती गुन्हे दाखल करावेच लागतील, अशी भूमिका पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी घेतली.

----------

### लष्कर प्रमुख मनोज पांडे

३१ मे रोजी सेवेतून निवृत्त होणार होते. ''मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने २६ मे रोजी लष्करप्रमुख जनरल मनोज सी पांडे यांच्या सेवेत एक महिन्याच्या कालावधीसाठी, त्यांच्या सेवानिवृत्तीच्या सामान्य वयाच्या (३१ मे), म्हणजे ३० जूनपर्यंत, नियमानुसार, मुदतवाढ देण्यास मंजुरी दिली. लष्करी नियम १९५४ च्या १६ ए (४), नुसार ही मुदतवाढ देण्यात आल्याचे '' संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. ही घोषणा अशा वेळी आली जेव्हा त्यांच्यानंतरचे दोन वरिष्ठ अधिकारी देखील जूनमध्ये सेवानिवृत्त होणार आहेत.

-----------

### सहाव्या टप्प्यात इंडिया

आणि हेराफेरी देशातील मतदारांना समजली आहे. भाजपाचे विजयी अभियान लवकरच संपुष्टात येत असल्याने पंतप्रधानांकडे निवृत्तीच्या योजना तयार करण्यासाठी अतिरिक्त वेळ आहे, असे ते म्हणाले. पंतप्रधानांना पराभव अगदी जवळ दिसतो तेव्हा ते आणखी भ्रामक गोष्टी बोलतात. आता ते म्हणतात की, त्यांना देवाने पाठवले आहे. कदाचित ते त्याच्या पुढच्या कारकिर्दीत स्वत:ला गॉडमॅन म्हणून पाहतील. त्यांच्या अनुयायांनीही त्यांचा मुद्दा मान्य केला आहे. पुरी येथील भाजपाचे उमेदवार संबित पात्रा म्हणाले की, भगवान जगन्नाथ हे पंतप्रधानांचे भक्त आहेत. भारतातील मतदार या दोघांना धडा शिकवणार आहेत. ही निवडणूक काँग्रेस पक्षाच्या सकारात्मक प्रचाराभोवती केंद्रित झाली असल्याचेही ते म्हणाले.

-------------

### धारूरमध्ये अनेक गावांना

साहित्याचे नुकसान झाले.आगीचेकारण समजू शकले नाही .दुसरे शेतकरी शेषराव बाजीराव नागरगोजे यांच्या घरावर बाभळीचे मोठे झाड कडून घराचे मोठे नुकसान झाले आहे सुदैवाने यात कुठलीही जीवित हानी झाली नाही. तालुक्यात मागील पंधरा दिवसापासून अधून मधून अवकाळी पावसाची हजेरी सुरूच आहे . .या पावसाच्या दरम्यान मोठ्या प्रमाणात सुसाट वारा होत असल्यामुळे याचा फटका शेतीत मशागतीची कामे करणाऱ्या मजुरांना होत आहे .तसेच घरावरील पत्रे उडणे , झाडे मोडून पडणे हे प्रकार सतत होत आहेत .रविवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या दरम्यान सोनीमोहा , घागरवाडा, थेटेगव्हान , आंबेवडगाव , जहागिरमोहा परिसरात मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील गोठ्यावरील पत्रे उडणे , झाडे मोडून पडण्याचे प्रकार घडत आहेत .अवघ्या दहा ते पंधरा मिनिटे होत असलेले सुसाट वाऱ्यामुळे सर्वत्र हाहाकार उडत आहे .तसेच या वादळी वाऱ्यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रकारे घडत आहेत.

-----------

### भ्रष्टाचारी खेकड्याकडून आता

टेंडरची काम करण्यास सांगितली. त्यासोबतच इतर खरेदी प्रकरणात दबाव आणला. पण मी नियम बाह्य काम केली नाहीत म्हणून माझं निलंबन करण्यात आले आहे, असा आरोप पवार यांनी केला आहे. आरोग्य विभागात ॲम्बुलन्स खरेदीत साडेसहा हजार कोटी रुपयांची दलाली खाणाऱ्या भ्रष्टाचाराच्या खेकड्याने आता अधिकाऱ्यांनाही नांग्या मारण्यास सुरुवात केली, असा टोला रोहित पवारांनी लगावला आहे. आपल्या एक्स (आधीचे ट्वीटर) अकाऊंटवरुन हे पत्र पोस्ट करताना रोहित पवारांनी, नियमबाह्य टेंडरिंगला नकार दिल्यामुळे व्यवस्थेतील याच खेकड्याने निलंबित केल्याची तक्रार पुणे महापालिकेतील आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. नियम बाह्य टेंडरसाठी कात्रजच्या कार्यालयात बोलावून दबाव आणणारा हा मंत्री म्हणजे आरोग्यमंत्रीच आहे का? असा सवाल उपस्थित करत आरोग्यमंत्र्यांवर निशाणा साधला आहे. तसेच हा आरोग्यमंत्री असेल तर संपूर्ण आरोग्य खात्याला आपल्या पोखरणाऱ्या या मंत्र्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब आपण अजून किती दिवस पाठीशी घालणार? आरोग्य व्यवस्थेला लागलेली ही कीड काढण्यासाठी सर्जरी कधी करणार? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

----------

### शाळांमध्ये मनुस्मृतीचे

घेण्यास आंबेडकरी जनतेचा तीव्र विरोध असल्याचे रामदास आठवलेंनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना दूरध्वनी द्वारे सांगितले. त्यावर दीपक केसरकर यांनी मनुस्मृती चे श्लोक अभ्यासक्रमात घेणार नसल्याचे आश्वासन रामदास आठवलेंना दिले.

-----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २७ मे २०२४ ३

## साक्षाळपिंप्री कनिष्ठ महाविद्यालयातून गायत्री जगताप बारावीच्या परीक्षेत प्रथम



नवगण राजुरी :-बीड तालुक्यातील साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८ टक्के एवढा लागला असून कु.जगताप गायत्री प्रदीप हि विद्यार्थिनी विज्ञान शाखेतून प्रथम आली आहे. साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून विज्ञान शाखेतून प्रथम कु.जगताप गायत्री प्रदीप ९२.८३ द्वितीय पव्हणे भागवत राजेंद्र ९२.१७ ,तृतीय जोगदंड समृद्धी मोहन ९१ टक्के असे ४०५ पैकी ४०२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९९.२५ टक्के निकाल लागला तर कलाशाखेतून प्रथम कुमारी पांचाळ पल्लवी विश्वांभर८५.३३% ,द्वितीय खाकरे राधिका महादेव ८३.१७% ,तृतीय घंटलवाड ओमकार देवराव ८२.८३ ,गोरे मोनिका दादासाहेब ८२.८३ ,७९ पैकी ७५विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९४.९३% निकाल लागला. वाणिज्य शाखेतून प्रथम घोलप साहस सुनील ९१.१७%, द्वितीय गवते प्रसाद मधुकर ७८%, तृतीय गवते अभिषेक हनुमान ७७. ५० असे २७ पैकी २६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.२९ टक्के निकाल लागला .एकूण शेकडा निकाल ९८ टक्के एवढा लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर ,युवा नेते रोहित क्षीरसागर ,संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाह एम. ए.राऊत ,साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ, पर्यवेक्षक जनार्दन काळे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# नेकनूरच्या स्त्री रुग्णालयात सावळा गोंधळ

## कर्मचाऱ्यांची नागरिकांशी आरेरावी; ठराविक दुकानातून औषधे घेण्याचा आग्रह

**नेकनुर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील नेकनूर येथील स्त्री रुग्णालय मध्ये गोळ्या औषधांचा तुटवडा अनेक दिवसांपासून दिसू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून रुग्णालयामध्ये रुग्णांची हेळसांड होताना सुद्धा पाहायला मिळत आहे. अनेक औषध तसेच गोळ्या बाहेरून घेण्याचे डॉक्टर सांगत आहेत. पित्त गोळी, खोकल्याचे औषध तसेच अनेक प्रकारच्या गोळ्या डॉक्टर बाहेर घेण्यास सांगतात. औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे गोरगरीब रुग्णांचे हाल होत असून, त्यांना औषधे विकत घ्यावी लागत आहेत. गोरगरीब रुग्णांना आरोग्य सेवा व्यवस्थित मिळाव्यात आणि नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी सरकारने जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू केली आहेत. गोरगरिबांना कोणत्याही प्रकारे त्रासाला सामोरे जावे लागू नये, त्यांच्यावर व्यवस्थित उपचार व्हावे यासाठी आरोग्य विभागाकडून ४०० पेक्षा अधिक प्रकारच्या गोळ्या-औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरवला जातो.

मात्र, बीड तालुक्यातील नेकनुर येथील स्त्री रुग्णालय नेकनूर मध्ये अनेक प्रकारच्या गोळ्या-औषधे उपलब्ध नाहीत. काही दिवसांपासून या रुग्णालयामध्ये सुविधांचा बोजवाराही झाला आहे. एकतर डॉक्टरांची वेळेवर उपस्थित न राहणे त्यात औषधांचा तुटवडा यामुळे परिसरातील गोरगरीब जनता त्रस्त झाली आहे. डॉक्टरांकडून औषधे लिहून दिली जातात; मात्र औषध देणारे कर्मचारी गोळ्या बाहेरून घ्या, असे सांगतात. येथे जखमेवरील औषधे, टीबी, बीपीवरील गोळ्याही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी दहा गोळ्या लिहून




दिल्या, तर कर्मचारी फक्त चारच देतात. अनेकदा औषध असूनही नसल्याचे कर्मचारी सांगतात.

सध्या औषध उपलब्ध नसल्याने बाहेरून औषधे विकत घ्या, असे स्त्री रुग्णालय नेकनुर येथील कर्मचारी रुग्णांना सांगत आहेत.

रुग्णालयाचा भोंगळ कारभारामुळे मात्र रुग्णांचा जीव टांगणीला लागला आहे. नर्सची पत्रकाराला सुद्धा अरेरावीची भाषा, रविवारी सकाळी ११ वाजता पत्रकार अभिजीत पवार नामक त्या ठिकाणी रुग्णालयामध्ये गेले असता त्यांना सुद्धा तुम्ही सकाळी लवकर यायचे ना दहाच्या अगोदर आमच्या मागे आता खूप काम आहे. आता होणार नाही नंतर या अशा प्रकारचे नर्स ने पत्रकाराशी सुद्धा म्हटले आहे. नंतर डॉक्टरला फोन करून पत्रकाराने विचारले असता मी पत्रकार आहे असे म्हटल्यावर लगेच नर्सने दखल घेतली. जर पत्रकारांना अशा गोष्टींना सामोरे जावे लागते तर सामान्यांचे काय यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

उन्हाळा वाढत असल्याने वातावरणात बदल झाले आहेत. त्यामुळे विविध आजारांनी डोके वर काढले आहे. शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या रांगा लागत आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात गोरगरिबांचा समावेश आहे. परंतु या शासकीय आरोग्य केंद्रात औषधांचा तुटवडा असल्याने रुग्णांमध्ये नाराजी आहे. मोफत उपचार मिळावे म्हणून गोरगरीब जनता प्राथमिक आरोग्य केंद्रात येतात; मात्र औषधे नसल्याने हजारो रुपयांचे औषध घेण्याचे प्रसंग गोरगरीब जनतेवर येत आहे. रविवार दिवशी गर्दी असल्यामुळे तेथील येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना बाहेरूनच औषधे घ्यावी लागत होती. नेकनूर मध्ये मोठी बाजारपेठ असल्यामुळे त्या ठिकाणी पंचक्रोशीतील नव्हे तर जिल्ह्यातील व्यापारी वर्ग शेतकरी वर्ग त्या ठिकाणी आपली जनावरे विकण्यासाठी येत असतात. या दिवशी रुग्णालयामध्ये गर्दी निर्माण होते.

डॉक्टरांकडून औषधे लिहून दिली जातात; मात्र औषध देणारे कर्मचारी गोळ्या बाहेरून घ्या, असे सांगतात. येथे जखमेवरील औषधे, टीबी, बीपीवरील गोळ्याही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी दहा गोळ्या लिहून दिल्या, तर कर्मचारी फक्त चारच देतात. अनेकदा औषध असूनही नसल्याचे कर्मचारी सांगतात.

## नागरिकांना शासकीय दराने वाळू उपलब्ध करून द्या -बोर्डे

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात व गेवराई तालुक्यात गेवराई शहरामध्ये बांधकाम ग्राहकांना कमी किमतीत रकमेमध्ये वाळू मिळावी असे शासनाचे धोरण असताना प्रत्यक्षात मात्र ग्राहकांना चढ्या दराने वाळू खरेदी करावी लागते याबाबत बीड जिल्हा ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष व गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्रप्रमुख अनिल बोर्डे यांनी गेवराई येथील नायब तहसीलदार श्री संजय जी सोनवणे यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.



सध्या बीड जिल्ह्यात व इतर नद्यांमधून व गोदावरी पात्रातून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास येत आहे . यावर शासनाने वेळीच कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु तसे होताना निदर्शनास येत नाही. त्यामुळे ग्राहकांना वाळू चढ्या दराने घ्यावी लागते. त्यामुळे शासनाचा महसूल देखील वसूल होत असल्याचे दिसत नाही. त्यामध्ये शासनाची मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन ग्राहकाची देखील पिळवणूक होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे ग्राहकांना योग्य दरात वाळू उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी वेळीच होऊन लिलाव प्रक्रिया पारदर्शक प्रमाणे राबविणे आवश्यक आहे. बीड जिल्ह्यात ग्राहकांना योग्य दरात वाळू मिळेल याबाबत ठोस उपाययोजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. यामध्ये ग्राहक हित जोपासण्यातील याप्रमाणे कारवाई होणे अपेक्षित आहे. यामध्ये ग्राहकाची पिळवणूक होणार नाही याबाबत योग्य ती कार्यवाही युद्ध पातळीवर होणे आवश्यक आहे. निवेदन देताना बीड जिल्हा ग्राहक पंचायत चे उपाध्यक्ष अनिल बोर्डे गेवराई ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रा. भानुदास फलके प्रा. ए. ए. चव्हाण इंजिनीयर नारायण अवधूत गणेश रामदासी मोहन राजहंस आर जी थळकर आधी जण हजर होते.



**बीड : स्व: विलासरावजी देशमुख साहेब यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले आहे याप्रसंगी अभिवादन करताना ॲड महादेव धांडे प्राचार्य दिनकरराव तेलप सेल्स टॅक्स अफिसर शिंदे साहेब भारतराव धांडे शशिकांत आगवान ॲड योगेश शिंदे**



**पुणे - सृष्टी सेवा भावी संस्था अंबाजोगाई जि बीड या संस्थेच्या वतीने रविवारी पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा जगताप,झी २४ तासच्या रिपोर्टर चैत्राली राजापूरकर, क्राईम रिपोर्टर श्रावणी कामत यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे स्वागत करताना मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व विकास डोंगरे यांनी स्वागत केले.**

## वादळी वाऱ्यामुळे सिमेंट कॉँक्रीटची कमान कोसळली; कारचा चुराडा, दोन अभियंता बालंबाल बचावले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पूस येथून अंगावर शहारे आणणारी घटना समोर आली आहे. रविवारी (दि.२६) दुपारी अचानक सुरू झालेल्या वादळी वाऱ्यात चक्क रोडवरील सिमेंट कॉँक्रीटची कमान जमीनदोस्त झाली. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही.

पूसच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात येथील सुप्रसिद्ध पद्मावती देवी मंदिराची स्वागत कमान असून ती सिमेंट कॉँक्रीटची आहे. रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग एवढा प्रचंड होता की त्याच्या जोराने ही कमान कोसळली. यावेळी कमानीखाली उभ्या असलेल्या कारवर (टीएस ०८ एचएम ०२०९) कमान कोसळल्याने कार अक्षरशः चपटी झाली आहे. सुदैवाने सदरील कारमधील अभियंता जी. अजयकुमार आणि ए. व्यंकटेश हे दोघे चहा पिण्यासाठी बाजूच्या हॉटेलमध्ये गेले असल्याने ते बचावले. हे दोन्ही



अभियंता लातूर-परळी महामार्गाच्या कामावर रुजू असून ते हैदराबाद येथून पुसला येऊन परळी रोडवरील डांबर प्लांटकडे निघाले होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज ते बचावले अशी भावना ग्रामस्थांनी बोलून दाखवली.

पान ६ वरून...

### तलाठी अनिकेत शिरसाठ

शिवाचार्य मानूरकर महाराज, मानूर गावचे लोकनियुक्त सरपंच अशोक पाखरे, माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथरावजी वनवे, जिल्हा परिषद सदस्य रामदासजी बडे, तात्यासाहेब लाड (सरपंच,चिखली ता.पाटोदा), देविदास लाड (पोलीस पाटील, चिखली ता.पाटोदा) , टाकळीमानुर गावचे माजी उपसरपंच राजेंद्र नागरे, मानूर गावचे माजी उपसरपंच शौकत भाई सय्यद,आदिनाथ नागरगोजे(संस्थापक:- गणेशानंद अर्बन बँक),भारत पाखरे , कारभारी कदम , माऊली खेडकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनेक वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अनिकेत च्या यशाबद्दल तसेच त्याच्या कुटुंबाबद्दल गौरवोद्गार करत अनिकेतला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शुभेच्छा देत मानूर गावांतून तुझ्याप्रमाणेच भरपूर असे -१ आणि -२ अधिकारी व्हावे आणि तु सुद्धा अजून मोठ्या पदावर विराजमान व्हावा अशी इच्छा व्यक्त करत अनिकेतवर शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी अनिकेत बाळासाहेब शिरसाठ यांनी स्वतःचे मनोगत व्यक्त करताना प्रथमतः सर्व ग्रामस्थ मंडळीचे आभार मानले व आत्ताची तरूण पिढी ही अत्यंत हुशार आहेत व परिवाराच्या परिस्थितीची जाणीव ठेवणारी आहेत तसेच आत्ता नुकत्याच काही परिक्षा पार पडलेल्या आहेत त्यामध्ये मानूर गावातील अजून काही तरूण पास होऊन अधिकारी होतील असा विश्वास व्यक्त करत परीक्षेची तयारी करण्यार्या तरूणांना बळ देण्याचे कार्य केले. त्याचबरोबर वडीलधारी व्यक्तींनी सुद्धा आपल्या मुलांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून त्याला शिक्षण पुर्ण करून अधिकारी होण्यास मार्गदर्शन व सहकार्य करावेत अशी इच्छा व्यक्त केली.

### सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यामध्ये

पित्र पूजन व गुरू पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हरिभक्त परायण प्रकाश महाराज बोधले यांनी सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याचे व मात्र पित्र पूजनाचे महत्त्व सांगून त्यांचे वृद्धापकाळात माता पित्याची सेवा करणे आवश्यक असताना स्वतःचे कुटुंब आणि स्वतःची समृद्धी याकडे मुले लक्ष देतात, त्यामुळे वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे याबाबत चिंता व्यक्त केली. आई-वडिलांनी मुलांना वाढवण्यासाठी सोसलेली झीज व खाल्लेल्या खस्ता यांचे स्मरण ठेवून आई-वडिलांचा सांभाळ करावा व आई-वडिलांच्या निस्वार्थ प्रेमाची जाण ठेवावी असे नमूद केले. याप्रसंगी -पोटी भार वाहे, त्याचे सर्वस्व ही साहे ! ऐसी कळवळ्याची जाती, लाभावीन करी प्रीती ! या अभंगातून माता पित्याची महती सांगितली. या कार्यक्रमासाठी तालुका दूध संघाचे अध्यक्ष विलास बापू बडगे, प्रसिद्ध उद्योजक बलभीमराव जाहेर पाटील ,बलभीमराव कुटे, डॉ पिके गुट्टे, प्रा श्रीधर ढास ,हरिभक्त परायण केशवदास वैष्णव, सरपंच लालासाहेब सालगुडे, प्रा .प्रकाश नाईकवाडे, घनश्याम दळवी , एनटी वाघमारे, श्री बळीराम राऊत एसटी महामंडळाचे व्यवस्थापक श्री कचरू बोबडे, काकडे सर, चंद्रकांत ढास व इतर मान्यवर , नातेवाईक व गावकरी हजर होते. भजनी मंडळ सुलतानपूर ,कानडी घाट, गोलांग्री, पाचंग्री, जरूड व उपस्थित मान्यवरांचा डॉ. भागवत सोपानराव नाईकवाडे यांनी सत्कार केला व आभार मानले.

## दोन दिवसाच्या बाळावर अंबाजोगाईच्या हॉस्पिटलमध्ये झाली यशस्वी शस्त्रक्रिया

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शौचाची जागा अर्धवट विकसित झालेल्या आणि दोन दिवस वय असलेल्या केज तालुक्यातील (जि.बीड) येथील बाळावर अंबाजोगाईच्या लाड हॉस्पिटल मध्ये अवघड अशा प्रकारची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. अखेर त्या बाळाला जीवदान मिळाले. आपले बाळ सुखरूप आहे हे पाहून बाळाच्या पालकांचा आनंद मात्र गगनात मावत नव्हता.

केज तालुक्यातील (जि.बीड) येथील नुकत्याच प्रसुती झालेल्या महिलेचे दोन दिवसाचे बाळ गुदद्वार नसल्यामुळे केज येथून अंबाजोगाई पर्यंत एका रूग्णवाहिकेमधून आणण्यात आले होते. त्या बाळाला तात्काळ लाड हॉस्पिटल, अंबाजोगाई येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले. बाळाची प्राथमिक तपासणी केल्यानंतर असे समजले की, बाळाची शौचाची जागा ही अर्धवट विकसित झालेली आहे. त्यामुळे बाळाची स्थिती ही अतिशय गंभीर (क्रिटिकल) होती. बाळाच्या नाड्या लागत नव्हत्या, बाळाचे पोट फुगलेले होते. बाळाचे वजन कमी होते. अशा नाजूक परिस्थितीत डॉ.विजय लाड यांनी गांभीर्य ओळखून त्या बाळावर लाड हॉस्पिटल मध्ये तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.



तत्पूर्वी त्या संदर्भात बाळाच्या पालकांशी चर्चा केली. त्यानंतर डॉ.विजय लाड यांनी त्यांचे मित्र आणि लहान मुलांचे शल्यचिकित्सक डॉ.रूपेश सिकची (अहिल्यादेवीनगर) यांच्याशी संपर्क साधला. तात्काळ शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. यापूर्वी ही अशा प्रकारच्या अवघड आणि दुर्मिळ अशा शस्त्रक्रिया या अंबाजोगाई शहरातील वैद्यकीय क्षेत्रात पहिल्यांदाच लाड हॉस्पिटल मध्ये झालेल्या आहेत. डॉ.रूपेश सिकची यांनी ही शस्त्रक्रिया यशस्विरीत्या पूर्ण केली. त्यानंतरची काळजी व पूर्ण उपचार (ट्रीटमेंट) डॉ.विजय लाड यांनी केले. शस्त्रक्रियेनंतर बाळाला तीन दिवस व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. पाचव्या दिवशी बाळाने उपचाराला योग्य असा प्रतिसाद दिला. त्यानंतर सहाव्या दिवशी बाळाला दुध देणे सुरू करण्यात आले. बाळाला दूध पचू लागले. हळू हळू दूध देण्याचे प्रमाण वाढविण्यात आले. बाळाच्या प्रकृती मध्ये चांगली सुधारणा दिसून आली. बाळ काही दिवस लाड हॉस्पिटल मध्येच राहिले. बाळ आता ठणठणीत व सुखरूप आहे. त्याला नुकतीच रूग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. ही यशस्वी शस्त्रक्रिया करण्यासाठी डॉ.रूपेश सिकची यांचे विशेष सहाय्य लाभले. तज्ज्ञांच्या प्रयत्नांनी दोन दिवसाच्या बाळाला जीवनदान मिळाले. तसेच लाड हॉस्पिटल मध्ये ज्या बाळांची लघवीची जागा व्यवस्थित नाही. त्यांचेवर सुद्धा यशस्विरित्या शस्त्रक्रिया करण्यात येते. अशी माहिती लाड हॉस्पिटलचे संचालक तथा सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.विजय लाड यांनी दिली आहे.

### वैद्यकीय क्षेत्रात दररोज आव्हाने

वैद्यकीय क्षेत्रात काम करीत असताना सतत नवनवीन आव्हानांचा सामना करावा लागतो. रूग्णांचे प्राण वाचविणे याला आमचे नेहमीच प्राधान्य राहीले आहे. नुकतीच वैद्यकीय क्षेत्रात अवघड समजली जाणारी शस्त्रक्रिया आणि ती देखिल दोन दिवसाच्या बाळावर करून बाळाला जीवदान देण्यात आम्हाला यश आले आहे. बाळ सुखरूप आहे. तर बाळाचे पालक हे आनंदी आहेत. हेच आमचे खरे समाधान आहे.

**-डॉ.विजय लाड** (सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ, अंबाजोगाई.)

### डॉक्टर आमच्यासाठी देवदूत..!

बाळाची शौचाची जागा ही अर्धवट विकसित झालेली होती. त्यामुळे बाळाची स्थिती ही अतिशय नाजुक होती. बाळाचे पोट फुगले होते अशा परिस्थिती मध्ये डॉ.विजय लाड यांनी गांभीर्य ओळखून बाळावर लाड हॉस्पिटल मध्ये त्यांचे मित्र डॉ.रूपेश सिकची यांच्या माध्यमातून यशस्वी शस्त्रक्रिया केली. डॉ.लाड आणि डॉ.सिकची यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. साक्षात एखाद्या देवदूताप्रमाणे आमच्या बाळाला नवे जीवदान दिले. त्याबद्दल डॉक्टरांचे आभार.

- बाळाचे पालक

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.२७ मे २०२४


# राज्यातील विकास सेवा संस्था आता संगणकीकृत

## शेतकऱ्यांना मिळणार १५१ सेवा गावातच



पुणे : राज्यातील विकास सहकारी सेवा संस्था अर्थात विविध सहकारी सोसायट्या संगणकीकृत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. त्यानुसार आता राज्यातील अनेक गावातील विकास सेवा संस्थांवर संगणकीकरण बसवण्यात आले आहे. यामुळे गावातील सेवा संस्थांमध्ये रजिस्टरवर चालणारे काम आता ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले आहे. तसेच इतर कामेही ऑनलाईन पद्धतीने व्यवहार सुरू झाले आहेत. या संस्था आता गावातच शेतकऱ्यांना १५१ सेवा पुरविण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.


पूर्वी केवळ रासायनिक खते पुरवणाऱ्या गावपातळीवरील विकास सेवा संस्था आता नवीन रूपात समाजासमोर आल्या आहेत. वीज बिल भरणे, ऑनलाईन बँकेचे व्यवहार करणे याचबरोबर गावातील सभासदांसाठी उपयुक्त गरजेच्या सेवाही या संस्था पुरवणार आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँकेशी संलग्न असणाऱ्या सेवा संस्था शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. या संस्था गावातील शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा गावातच पूर्ण करतात. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी विविध सेवा संस्थांचा हातभार महत्त्वाचा मानला जातो. गेल्या दोन महिन्यांत प्रत्येक गावातील विकास सेवा संस्थेच्या कार्यालयात नवीन संगणक, प्रिंटर, इंटरनेट उपकरणे दाखल झाली आहेत. सहकारी सेवा संस्थांचे दप्तरही संगणीकृत झाले असून, त्या अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. प्रत्येक गावातील सेवा संस्थांचा पारंपरिक लूक आता बदलला असून, त्या आधुनिक होत आहेत.

कर्जमाफीसाठी महत्वाचे योगदान ग्रामीण भागात पूर्वीपासूनच सेवा संस्थांचे योगदान चांगले आहे. जेव्हा मित्रखताची शेतकऱ्यांना गरज असे, तेव्हा सोसायटीत खत उपलब्ध व्हायचे. अलीकडच्या काळात सेवा संस्थेतून पीक कर्ज घेऊन शेतकरी रासायनिक खते, बी-बियाणे रोखीने घेऊ लागले. सेवा संस्थेतून शेती पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना सरकारच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला. जेव्हा जेव्हा कर्जमाफी झाली, तेव्हा सामान्य शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला. सेवा संस्था शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या आधारस्तंभ आहेत.

अधिक चांगल्या ऑनलाईन सुविधा मिळणार

डिजिटल तंत्रज्ञानामुळे गावे जगाशी जोडली जात आहेत. अशावेळी विकास सेवा संस्थांकडून सभासद शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सेवा वरदान ठरणार आहेत. गावोगावच्या विकास सेवा संस्था सरकारच्या मदतीने संगणकीकृत झाल्या आहेत. पुढील काळात सामान्य सभासदांना गावच्या सेवा संस्थेतून अधिक चांगल्या आणि ऑनलाईन सुविधा उपलब्ध होणार आहेत. सेवा संस्थेच्या सभासदांसाठी ही चांगली बाब असल्याची माहिती सेवा संस्थांच्या संचालकांकडून देण्यात येत आहे. वेळेची बचत, सोयीस्कर सेवा, पारदर्शक व्यवहार, अधिक चांगल्या सुविधा, कारच्या योजनांचा लाभ घेणे सोपे.

# बंदिस्त शेळीपालनासाठी बीटल उत्तम पर्याय



शेळी पालन हा शेतीपूरक व्यवसाय असून, कमी भांडवल व कमी जागेत हा व्यवसाय करता येण्यासारखा आहे. ज्यामुळे सध्या अनेक शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेळीपालन करताना दिसून येत आहे. शेळयांना इतर जनावरांपेक्षा जसे की गाय, म्हैस यांपेक्षा खूप कमी प्रमाणात खाद्य लागते. साधारणत: एका गाईला लागणाऱ्या खाद्यामध्ये १० शेळ्या पाळल्या जाऊ शकतात. त्यामुळे अल्प भू धारकांसाठी हा व्यवसाय अतिशय फायदेशीर आहे. त्यामुळे आता शेळीपालन करण्याचा विचार करत असाल तर शेळीची योग्य जात निवडणे खूप आवश्यक असते. याच पार्श्वभूमीवर 'बीटल शेळी' या शेळीच्या प्रजातीबद्दल माहिती जाणून घेणे आवश्यक ठरते.

बीटल शेळी ही भारतातील पंजाब प्रांतातील एक जात आहे. शेजारील देश असलेल्या पाकिस्तानमध्ये दूध आणि मांस उत्पादनासाठी या प्रजातीची शेळी पाळली जाते. शेळीची जात जमनापारी शेळी आणि मलबारी शेळी यांसारखी असते. या शेळीला 'लाहोरी बकरी' असेही म्हणतात. मोठ्या शरीराच्या आकारासह ते चांगले दूध काढणारे मानले जाते. कान सपाट लांब कुरळे आणि झुकलेले असतात. या शेळ्यांची कातडी उच्च दर्जाची मानली जाते. संपूर्ण भारतीय उपखंडात स्थानिक शेळ्यांच्या सुधारणेसाठी बीटल शेळ्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या शेळ्या स्टॉल फीडिंगसाठी देखील अनुकूल आहेत, त्यामुळे सघन शेळीपालनासाठी प्राधान्य दिले जाते.

बीटल शेळीची वैशिष्ट्ये ?

या शेळीचे मुळस्थान पंजाबमधील गुरुदास हे आहे. ही शेळी दुधासाठी चांगली मानली जाते. या शेळ्या आकाराने मोठ्या असतात. यांचा रंग काळा असून अंगावर पांढऱ्या रंगाचे डाग असतात. कान लांब लटकलेले असतात आणि आत वाकलेले असतात. मादीचे वजन ४० ते ५० किलो व नराचे वजन ५० ते ८० किलो असते. एका वेतातील दूध उत्पादन ५ ते ७ लिटरपर्यंत जाते. ही शेळी बंदिस्त पद्धतीसाठी योग्य आहे. कोणत्या जातीच्या शेळ्या पाळाव्यात? : राज्यासह देशभरात शेळ्यांच्या अनेक वेगवेगळ्या जाती वेगवेगळ्या हवामानात व प्रदेशात आहेत. साधारणपणे, गवताळ प्रदेशातील शेळया मोठ्या आकाराच्या व वजनाच्या असतात. आपल्या देशाचा विचार करता देशाच्या भौतिक रचनेनुसार वेगवेगळ्या ठिकाणी विषम हवामान आढळते. हवामानानुसार त्या भागात वेगळे अस्तित्व असणाऱ्या जातीची जडणघडण झाली आहे.

# खरिपात मका लागवड जास्त फायदेशीर

पुणे : देशात रब्बी पिकांचा हंगाम संपला आहे. शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. खरीप हंगामात अनेक पिके घेतली जात असली तरी. परंतु, देशाच्या बहुतांश भागात मक्याची लागवड केली जाते. मका शेती ही शेतकऱ्यांना जास्त फायदेशीर आहे. धानाच्या तुलनेत मका लागवडीत शेतकऱ्यांना दुप्पट नफा मिळू शकतो.

देशात वर्षभर मक्याची लागवड केली जाते. पाणी उपलब्ध असताना विविध भागातील शेतकरी वर्षभर शेती करतात. परंतु हे प्रामुख्याने खरीप पीक मानले जाते. खरीप हंगामात याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषतः ज्या राज्यांमध्ये शेतकरी पावसावर आधारित सिंचनावर अवलंबून आहेत, त्या राज्यांमध्ये शेतकरी पावसाळ्यात वरच्या जमिनीवर मका पिकवतात आणि त्याच्या लागवडीतून चांगले उत्पादन मिळते. मक्याचा भावही चांगला असेल तर त्याची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. विशेषत: मक्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे त्याला बाजारपेठेत मोठी मागणी आहे. खरिपातच जास्त मका का घेतला जातो. खरेतर खरीप हंगामात मका लागवड केल्याने हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक चक्र सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना अधिक नफाही मिळतो. कमी पावसातही तयार होणारे आणि चांगले उत्पादन देणारे हे पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतो.

उच्च उत्पादन क्षमता : खरीप मक्याचे सरासरी उत्पादन ५०-५५ क्विंटल/हेक्टर आहे. तर भाताचे सरासरी उत्पादन ३५-४० क्विंटल/हेक्टर आहे.

कीड व रोगाचा दाब कमी : भातापेक्षा मक्यावर किडीचा प्रादुर्भाव कमी असतो आणि कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी असतो.

बाजारातील उच्च मागणी आणि किमती : खरीप मका सामान्यतः रब्बी मक्यापूर्वी काढला जातो आणि पुरवठा तुलनेने कमी असताना बाजारात उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. पीक रोटेशनचे फायदे: खरीप मका हे गहू किंवा कडधान्ये यांसारख्या इतर पिकांसोबत आवर्तनाने पीक घेता येते, जमिनीची सुपीकता सुधारते आणि कीड आणि रोगांचा संचय कमी होतो.

खरिपातील मका लागवडीचे फायदे : पाण्याची कमी गरज कारण मका पिकाला खूप कमी पाणी लागते. एकीकडे मका पिकवण्यासाठी ६२७-६२८ मिमी/हेक्टर पाणी लागते, तर भात पिकवण्यासाठी सरासरी १०००-१२०० मिमी/हेक्टर पाण्याची गरज असते.



# भरघोस नफ्यासाठी मधमाशीपालन फायदेशीर



देशात मधमाशीपालन झपाट्याने वाढत आहे. तज्ज्ञ याला फायदेशीर काम म्हणतात. मधमाशीपालन करून मोठ्या प्रमाणात शेतकरी नफा कमावत आहेत. सरकार शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे काम करत आहे. केंद्र सरकार मधुमक्षिका पालनासाठी ८० टक्के अनुदान देते. त्याचबरोबर राज्य सरकारही या कामासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देते. मधमाश्यांच्या पेट्या, मध उत्खनन उपकरणे आणि प्रक्रिया यांसह मध वसाहतींसाठी सामान्य श्रेणीतील शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान दिले जाते. तसेच एससी-एसटी प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, १० खोक्यांमधून मधमाशी पालन सुरू करता येते. त्याची किंमत सुमारे ४० हजार रुपये आहे. मधमाशांची संख्याही दरवर्षी वाढते. मधमाश्या जितक्या जास्त तितके जास्त मध उत्पादन. तसेच नफाही त्यानुसार अनेक पटींनी वाढतो.

असे करतात संगोपण : मधमाश्या ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना सेंद्रिय मेणाची (पेटी) व्यवस्था करावी लागते. यामध्ये ५० हजार ते ६० हजार मधमाश्या एकत्र ठेवल्या जातात. या मधमाशा सुमारे एक क्विंटल मध तयार करतात. बाजारात शुद्ध मधाची किंमत ७०० ते १०० रुपये प्रति किलो आहे. जर तुम्ही प्रति पेटी १००० किलो मधाचे उत्पादन केले तर तुम्ही दरमहा लाखो रुपयांची बचत करू शकता. मधमाशी पालनाचे फायदे : फुलांचा रस/पराग यांचा सदुपयोग होतो. आर्थिक प्राप्ती मिळते व रोजगाराचा प्रश्न सुटतो. शुद्ध मधाचे उत्पादन, मेणाचे उत्पादन व इतर आधारीत वस्तुंचे उत्पादन होते. कोणत्याही इतर जास्तीच्या खताशिवाय, बियांशिवाय मधमाशी पालन हे शेताच्या बांधावर/शेतालगत केल्याने त्याचा फायदा शेतीला होतो. शेतीतील भाजी, फुलांच्या उत्पादनात सव्वा ते दिड पटींनी वाढ होते.कारण मधमाशा ह्या परागीकरणाचे काम उत्तमरित्या करतात. मधाच्या सेवनाने मानवाचे आरोग्य उत्तम राहते. ते एका प्राकृतिक औषधाचे काम करते. मधाचे सेवनाने अनेक रोग होत नाहीत. रक्तदाब, लठ्ठपणा आदी रोगांमध्ये फायदा होतो. मधमाशी पालनास फारच कमी खर्च लागतो व तुलनेने वेळपण कमी लागतो. त्यास जागाही फारच कमी लागते. कमी प्रतवारी असणाऱ्या जमिनीच्या शेतात मधमाशी पालनाचे फायदे आहेत. ती जमिन वापरात येते. पर्यावरणावर मधमाशी पालनाचा सकारात्मक प्रभाव पडतो. परागीकरणासाठी मधमाश्या फारच महत्त्वाची भूमिका पार पाडतात, त्यामुळे फळांचे उत्पादनही वाढते.

मधमाशी पालनासाठी लागणारे साहित्य : पोळे ही एक साधी लांब पेटी असते आणि तिच्या वरील भागावर अनेक पट्ट्या असतात. या पेटीचा अंदाजे आकार १०० सेंमी लांब, ४५ सेंमी रुंद आणि २४ सेंमी उंच असा असावा. ही पेटी २ सेंमी जाड असावी आणि पोळे १ सेंमी रुंदीच्या प्रवेश छिद्रांसहित एकत्र चिटकवलेले आणि स्क्रूने घट्ट केलेले असावे. वरील पट्ट्या पोळ्याच्या रुंदीइतक्याच लांबीच्या असाव्यात जेणेकरून त्या आडव्या बरोबर बसतील आणि त्यांची जाडी १.५ सेंमी असावी म्हणजे एक वजनदार मधाचे पोळे पेलण्यासाठी त्या पुरेशा होतील. प्रत्येक स्वतंत्र वरील पट्टीला एकेक पोळे तयार करण्यासाठी मधमाशांना आवश्यक नैसर्गिक जागा मिळण्याकरता ३.३ सेंमीची रुंदी ठेवणे गरजेचे आहे. धुराडं हे दुसरं महत्त्वाचं साधन आहे. ते लहान पत्र्याच्या डब्यापासून तयार करता येतं. मधमाशा आपल्याला चावू नयेत आणि त्यांना नियंत्रित करता येण्यासाठी त्याचा वापर केला जातो. कापड - मधमाशा पालन क्षेत्रात काम करताना माशांच्या दंशापासून आपले डोळे आणि नाकाचा बचाव करण्यासाठी. सुरी वरील पट्ट्या सैल करण्यासाठी आणि मधाची पोळी कापण्यासाठी. पिस मधमाशांना पोळ्यापासून दूर करण्यासाठी. राणीमाशीविलगक काड्याचीपेटी.

मधुमाशांच्या प्रजाती : दगडी माशी, अपीस डोरसाटा या माशा उत्तम प्रकारे मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन ५०-८० किलो असते. लहान माशी अपीस फ्लोरिआ या माशा कमी मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे अंदाजे २००-९०० ग्रॅम मध मिळतो. भारतीय मधमाशी अपीस सेराना इंडीका या मधमाशांद्वारे होणारे मध उत्पादन दर वर्षी प्रति वसाहत ६-८ किलो असते. युरोपिअन मधमाशी इटालिअन मधमाशी अपीस मेल्लीफेरा यांच दर वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन २५-४० किलो असते. डंखरहित मधमाशी त्रिगोना इरीडीपेन्नीस ही वर उल्लेख केलेल्या प्रजातींच्या शिवाय, केरळमध्ये आणखी एक प्रजाती अस्तित्वात आहे तिला डंखरहित मधमाशी म्हणतात. त्या खऱ्या अर्थाने डंखरहित नसतात, परंतु त्यांचा डंख पुरेसा विकसित झालेला नसतो. त्या परागीकरण चांगल्या प्रकारे करतात. त्यांच्याद्वारे दर वर्षी ३००-४०० ग्रॅम मध उत्पादन मिळते. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतमध्ये ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतर्फे मधमाशीवर आधारित पर्यटन म्हणजेच 'ॲपि-टुरिझम'चे देशातील नाविन्यपूर्ण व पहिलेच केंद्र स्थापन करण्यात आले असून त्याला पर्यटकांचाही दिवसेंदिवस चांगला प्रतिसाद मिळतो आहे.




### महत्वाच्या घटना

११५३ : माल्कम चौथा स्कॉटलंडच्या राजेपदी
१३२८ : फिलिप सहावा फ्रांसच्या राजेपदी
१७०३ : झार पीटर द ग्रेटने सेंट पीटर्सबर्ग शहराची स्थापना केली
१८१२ : ला कोरोनियाची लढाई.
१८१३ : १८१२चे युद्ध अमेरिकेच्या सैन्याने फोर्ट जॉर्ज किल्ला जिंकला.
१८८३ : अलेक्झांडर तिसरा, रशियाच्या झारपदी.
१८९६ : अमेरिकेच्या सेंट लुईस शहरात एफ.४ टोर्नेडो. २५५ ठार.
१९०५ : त्सुशिमाची लढाई.
१९०६ : महाराष्ट्र साहित्य परिषदेची स्थापना.
१९०७ : सान फ्रांसिस्को मध्ये प्लेगचा प्रादुर्भाव.
१९२७ : फोर्ड मोटर कंपनीने मॉडेल टी कारचे उत्पादन बंद केले व मॉडेल ए तयार करणे सुरू केले.
१९३० : त्याकाळी सर्वात उंच (३१९ मीटर १०४६ फूट) असलेल्या ख्रायसलर सेंटर या इमारतीचे न्यूयॉर्कमधे उद्घाटन झाले.
१९४१ : दुसरे महायुद्ध अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट यांनी देशात आणीबाणी जाहीर केली.
१९५१ : मुंबई येथे तारापोरवाला मत्स्यालय सुरू झाले.
१९६४ : गुलजारीलाल नंदा यांनी भारताचे हंगामी पंतप्रधान म्हणून कार्यभार स्वीकारला.
१९९४ : नोबेल साहित्य पुरस्कार विजेते रशियन लेखक अलेक्झांडर सॉल्केनिटसेन पाश्चिमात्य देशातील वीस वर्षांचा आपला वनवास संपवून आपल्या देशांत परतले.
१९९८ : ग्रँड प्रिन्सेस या जगातल्या (त्याकाळच्या) सर्वात मोठ्या व सर्वात महागड्या जहाजाने आपल्या पहिल्या सफरीला सुरुवात केली.
१९९९ : आंतरराष्ट्रीय न्यायालयाने हेग येथे स्लोबोदान मिलोसेविचवर कोसोवो मध्ये माणुसकीविरुद्ध अत्याचारांबद्दल गुन्हा दाखल केला.
२००२ : नेपाल चे तत्कालीन पंतप्रधान देऊबा यांना तीन वर्षाकरिता पक्षातून बाहेर काढण्यात आलं.
२००६ : जावाच्या योग्यकर्ता शहरात भूकंप. ६,६०० ठार.
२००८ : भारत सरकारने सिमेंटच्या निर्यातीवर लावलेला प्रतिबंध मागे घेतला.
२०१० : भारतातील ओडिसा राज्याच्या बालासोर जिल्ह्यातील चांदीपूर या ठिकाणी अणु तंत्रज्ञानाने सज्ज असलेल्या धनुष आणि पृथ्वी २ क्षेपणास्त्रांची भारतीय लष्करी दलाने यशस्वी चाचणी केली.
२०१६ : हिरोशिमा पीस मेमोरियल पार्क आणि हिबाकुशाला भेट देणारे बराक ओबामा अमेरिकेचे पहिले राष्ट्रपती आहेत.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३२ : डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे, कादंबरीकार, कवी, मर्मग्राही समीक्षक
१९१३ : चित्रकार व नृत्यदिग्दर्शक कृष्णदेव मुळगुंद यांचा जन्म. (मृत्यू: ११ मे २००४)
१९२३ : अमेरिकेचे ५६ वे राष्ट्राध्यक्ष व नोबेल पारितोषिक विजेते हेन्री किसिंजर यांचा जन्म.
१९३१ : पद्मश्री, पद्मविभूषण तसचं, संगीत क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार आणि उत्कृष्ट साहित्य क्षेत्रांतील सर्वोच्च पुरस्कार ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट भारतीय लेखक, कवी, नाटककार, अनुवादक, आणि गीतकार डॉ. ओट्टाप्लाक्कल नीलकंदन वेलु कुरुप यांचा जन्मदिन.
१९३६ : भारतीय धावपटू आणि पत्रकार रणजीत भाटीया यांचा जन्मदिन.
१९३८ : कादंबरीकार डॉ. भालचंद्र वनाजी नेमाडे यांचा जन्म.
१९५७ : भारतीय वकील आणि राजकारणी नितीन गडकरी यांचा जन्म.
१९६२ : भारतीय क्रिकेटर रवी शास्त्री यांचा जन्म.
१९६३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय अमेरिकन व्यवसायिक तसचं, ॲडोब इंक चे माजी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शंतनू नारायण यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१० : नोबेल पारितोषिक मिळालेले जर्मन डॉक्टर रॉबर्ट कोच यांचे निधन. (जन्म: ११ डिसेंबर १८४३)
१९१९ : भारतीय लेखक कंधुकुरी वीरसासिंगम यांचे निधन. (जन्म: १६ एप्रिल १८४८)
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाबाई भीमराव आंबेडकर यांचे निधन.
१९६४ : पंडित जवाहरलाल नेहरू, भारताचे पहिले पंतप्रधान.
१९८३ : भारतीय राजकारणी व माजी लोकसभा अध्यक्ष तसचं, राजस्थान राज्याचे माजी राज्यपाल सरदार हुकम सिंह यांचे निधन.
१९८६ : प्रा. अरविंद मंगरुळकर, संगीत समीक्षक आणि संस्कृतचे अभ्यासक.
१९८६ : भारतीय राजकारणी, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री अजय मुखर्जी निधन. (जन्म: १५ एप्रिल १९०१)
१९९४ : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्रातील थोर विचारवंत, संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे मुख्य संपादक.
१९९८ : अर्थतज्ञ मिनोचर रुस्तुम तथा मिनू मसानी यांचे निधन. (जन्म: २० नोव्हेंबर १९०५)
२००७ : हॉट एअर बलून चे निर्माते एड यॉस्ट यांचे निधन. (जन्म: ३० जून १९१९)
२००८ : ऑस्कर पुरस्कार विजेते अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक, निर्माता आणि अभिनेता सिडनी इर्विन पोलॅक यांचे निधन.
२०१६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित धाडसी भारतीय लष्कर सैन्याच्या आसाम रेजिमेंटचे शिपाई हवालदार हंगपन दादा यांचे निधन.

cmyk

# लाचखोरीमुळे महावितरणकडुन शेतकऱ्यांच्या व व्यवसायिकाच्या जीवाशी खेळ

## चक्री वादळात ३३ केव्हीची पाच पोल जमीनदोस्त





अंबाजोगाई । प्रतिनिधी

शनिवारी सायंकाळी तालुक्यातील दहा गावाला चक्री वादळाने वेढले. यात शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. लाचखोरीमुळे महावितरणकडुन शेतकर्यांच्या व व्यवसायिकाच्या जीवाशी खेळ सुरु असुन ३३ केव्हीच्या लाईन शिप्टींगमध्ये मंजुरी केबलची असताना तारा ओढलेले पाच खांब कालच्या चक्री वादळात जमीनदोस्त झाले यात ; जीवीत हानी झाली नसली तरी महावितरणचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गेल्या तीन दिवसापासुन वीज पुरवठा खंडीत झाल्याणे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील पुस येथील अकरा शेतकर्यांनी गिरवलीच्या २२० केव्ही केंद्रातुन घाटनांदुर ३३ केव्ही केंद्राला जाणारी लाईनला पन्नास वर्षे पुर्ण झाले असुन ते कुमकुवत झाले आहेत.त्यामुळे ते केंव्हाही पडुन मोठा अपघात होईल अशा आशयाची तक्रार १५ डिसेंबर २३ रोजी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याकडे केली होती. पण कारवाई काहीच झाली नाही. कालच्या चक्री वादळात ही लाईन जमीन दोस्त झाल्याने मोठा अनर्थ टळला आहे. श्रीकर त्र्यंबकराव फड रा रामनगर नांदेड यांच्या पुस येथे ४८३ गटा मध्यें जमीन असुन या गटात पेट्रोल पंप होत असुन गटातुन ३३ केव्ही लाई रस्त्यालगत शिफ्ट करण्यासाठी ४ लाख रुपये महावितरण कडे भरले. शिप्टींग मंजुरी मध्ये केबल टाकायचे मंजुर असताना कनिष्ट अभियंता सतिश गुडे व वरीष्ट अभियंता कानडे यांनी २ लाख ची लाचेची मागणी केली परंतु फड यांनी ती पुर्ण न केल्यामुळे कंत्राटदाराचा लाभ होईल याउद्देशाने दोन्ही अभियंत्यानी केबल ऐवजी तार ओढली. याची तक्रार सहव्यवस्थापकीय संचालक छत्रपती संभाजी नगर, मुख्य अभियंता लातुर, अधिक्षक अभियंता बीड व उर्जा मंत्री यांच्याकडे केली होती. त्यानंतर दोन्ही अभियंत्यांची चौकशी समिती नेमली. या समितीने दोन्ही अभियंत्यानी पदाचा गैरवापर करून गुत्तेदाराचा फायदा होईल असे कृत्य केल्याचे दिसुन आल्याचा अहवाल दिला. यात तक्रारदाराच्या तक्रारीत तथ्य आढळुन आल्याणे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांनी २३ एप्रील रोजी दिलेल्या गोपनीय अहवालात कनिष्ट अभियंता सतिश गुडे, वरीष्ट अभियंता कानडे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन विभागीय चौकशीअंती अंतिम शिक्षा प्रस्तावीत करण्याकरिता कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी असा आदेश महिनाभरापुर्वी दिला असतानाही संबधितांवर कार्यवाही झाली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. लाचखोरीमुळे महावितरणकडुन शेतकर्यांच्या जीवाशी खेळ सुरु असुन ३३ केव्हीच्या लाईन शिप्टींगमध्ये मंजुरी केबलची असताना तारा ओढल्या आहेत. कालच्या चक्री वादळात ३३ केव्हीची पाच पोल जमीनदोस्त झाल्याने मोठी जीवीत हानी टळली आहे.

### परवाच्या पावसातच वीजेचा करंट उतरला होता

गेल्या तीन दिवसापासुन वीजेसह पावसाचा कहर सुरु असुन शिप्ट केलेल्या पोलमध्ये आमच्या जनावरांना करंट लागलेला आहे. त्यामुळे आमच्या सावधगिरीमुळे जीवी हानी झाली नाही. तसेच माझ्या शेतात पेरणीपुर्व मशागत सुरु होती त्यातच चक्री वादळ आल्याने शेतातील मजुरावर या तार व खांब कोसळले असते तर मोठी जीवीत हानी झाली असती...महावितरण कंपनीने माणसाला मारण्याचा ठेका घेतला आहे का? असा संतप्त सवाल शेतकरी चंद्रशेखर गौरशेटे यांनी केला आहे.

### दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न

दोन्ही अभियंत्यावर काय कारवाई केली असे अधिक्षक अभियंता घुमे यांना विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे देऊन दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याणे या प्रकरणात संशय बळावला आहे.

### लाचेची मागणी पुर्ण न केल्यानेच माझी फसवणुक

माझ्या व्यवसायिक जागेतील ३३ केव्ही लाईन शिफ्ट करण्यासाठी महावितरणच्या नियमाप्रमाणे चार लाख रुपये भरले आहेत. महावितरणकडुन दिलेल्या कोटेशन प्रमाणे पुर्तता केली आहे .मंजुरी केबल ची असताना तारा ओढल्या आहेत.व सुपरव्हिजन महावितरण ने करायचे असते ते जाणीवपूर्वक चुकीचे केले आहे. कालच्या चक्रीवादळात बेकायदेशीर असलेले तार पोल माझ्या जागेत वाकलेले आहेत. खरे तर तेथे नियमाप्रमाणे केबल असायला पाहिजे. माझ्या व्यवसायिक जागेत पेट्रोल पंपावर काम करणार्या मजुर जीवाशी गेले असते. याला कोण जवाबदार राहणार. महावितरण कडून सुपर विजन व्यवस्थित झाले नाही.म्हणुन माझी फसवणुक झाली आहे. श्रीकर त्र्यंबकराव फड, व्यवसायिक व शेतकरी, पुस.

# धारुर शहरातील किल्ला परिसरात वृक्षसंवर्धन उपक्रम साजरा



धारूर/ प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था पुणे सारथी- राज्याभिषेक अभियान ३५० या उपक्रमा अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज वनश्री सारथी उपक्रम महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करत असताना वनसंवर्धनाला खूप महत्त्व दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकास ३५० वर्ष पूर्ण होत असल्याने वृक्ष संवर्धन करून राज्याभिषेक दिन साजरा करण्यासंदर्भात सारथी पीएचडी धारक अधिछात्रवृती घेणाऱ्या सर्व सहभागी विद्यार्थ्यांना उपक्रम राबवण्याबाबत आव्हान केले होते, त्यानुसार महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे संशोधन केंद्राजवळील ऐतिहासिक किल्ला परिसरातील डोंगर पायथा या ठिकाणी सीडबॉल च्या माध्यमातून विविध पारंपारिक वृक्षांची लागवड होण्यासाठी सिडबॉल टाकण्याचा उपक्रम आज सकाळी ऐतिहासिक महादुर्ग किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन सीडबॉल उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. नेहा पटाईत यांनी शिवराज्याभिषेक सोहळ्यास ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने गडकिल्ला परिसरात व गावोगाव वृक्षसंवर्धन लोकचळवळ प्रभावी करण्यासाठी सीडबॉल उपक्रमाचे महत्व सांगितले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील पीएचडी विद्यार्थीनी नेहा नंदकुमार पटाईत, हर्षदा रमेश गलांडे, मयुरी रामचंद्र खराडे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथील पीएचडी विद्यार्थीनी स्नेहल नंदकुमार पटाईत यांनी प्रत्येकी शंभर ते सव्वाशे सीडबॉल तयार करुन जवळपास पाचशे सीडबॉल ऐतिहासिक किल्ले धारूर महादुर्ग किल्ल्याच्या परिसरात डोंगर व पायथ्यावर सीडबॉल टाकून छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा राज्यभिषेक दिनानिमीत्त वनश्री उपक्रम साजरा केला. सीडबॉल मध्ये कडुलिंब, वड, पिंपळ, गुलमोहर इत्यादी बियांचा वापर करुन सीडबॉल तयार केले. या ऐतिहासिक महादुर्ग किल्ला डोंगर पायथा परिसरात सीडबॉल टाकून वनसंवर्धन करण्याचा उपक्रम राबवला.

यावेळी किल्ले धारुर शहरातील पत्रकार अतुल भैय्या शिनगारे, पत्रकार शाकेर सय्यद, पत्रकार ईश्वर खामकर, सह्याद्री इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजचे संचालक प्रा.नारायण शिनगारे, आदर्श शिक्षक सुरेश शिनगारे, सामाजिक कार्यकर्ते प्रा.विजय शिनगारे व पर्यटक यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रम साजरा केला. सारथी अंतर्गत पीएचडी धारक अधिछात्रवृती घेणाऱ्या विद्यार्थीनी यांनी राबविलेल्या सीडबॉल उपक्रमाचे कौतुक केले. वृक्षसंवर्धन लोकचळवळ प्रभावी करण्यासाठी शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी व सर्व नागरिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

# बालसंगोपन योजना वंचित बालकांसाठी संजीवनी ठरावी -विधाते




बीड । प्रतिनिधी

शहरातील अंगणवाडी ताई ग्रुप च्या वतीने शासकीय योजना आणि अंगणवाडी ताईची भुमिका या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शिका म्हणून बीड नगरपरिषदेच्या मा. महिला व बालकल्याण सभापती सौ. जयश्री विलास विधाते या लाभल्या होत्या तर वैद्यकीय सल्लागार म्हणून सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. मोनिका सानप या उपस्थित होत्या.

शासकीय योजना आणि अंगणवाडी ताईची भुमिका विषद करताना सौ. विधातेताई यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजने बदल सविस्तर माहिती देताना ही योजना ० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, बालकामगार, तसेच जन्मठेप कैद्यांची संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेली मुलं, दुर्धर आजाराने बाधीत असलेल्या पालकांची, कोवीड, नैसर्गिक आपत्तीमध्ये पालक गमावलेली कौटुंबिक संकटग्रस्त, एकल पालकांची, दोन्ही पालक दिव्यांग असलेली कौटुंबिक हिंसाचारग्रस्त भिक्षेकरी गृहाची दाखल झालेल्या उपेक्षित वंचित बालकांसाठी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना नवसंजीवनी ठरेल या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या परिसरातील अंगणवाडी ताई, स्वंयसेवी संस्था व बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा महिला बालविकास अधिकारी यांच्या शी संपर्क साधून अर्ज सादर करावा या योजनेद्वारे पात्र बालकाला प्रति बालक रूपये २,२५०/- दरमहा परिपोषण अनुदान तर स्वयं सेवी संस्थेला रूपये २५० /- दरमहा सहायक अनुदान मिळेल. प्रत्येक बालकाला सन्मानाने जगता यावे म्हणून शासनाच्या अनेक योजना असतात परंतु त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली तर ती योजना शेवटच्या घटका पर्यंत पोहचू शकले तेंव्हा आई एव्हढीच अंगणवाडी ताईची भुमिका महत्त्वाची असते मत डॉ. सानप यांनी व्यक्त केले. या वेळी अंगणवाडी ताई ग्रुप च्या सदस्या आणि बीड शहरातील अनेक महीला उपस्थित होत्या.

# दुष्काळ परिस्थितीशी सामना करण्यासाठी उपाययोजना करावी-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

जिल्हाभरात भीषण दुष्काळ परिस्थिती निर्माण झाली असून, पिण्याचे पाणी, जनावरांना चारा याची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. सर्व जलसाठ्यातील पाण्याने निच्चांक गाठला आहे. अनेक खेडे गावात पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती सुरु झाली. शेतकऱ्यांकडे असलेला चाऱ्याचा साठा संपुष्टात आल्याने पाणी व चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर असून दुष्काळाशी सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी असे निवेदन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिले. या निवेदनात म्हटले आहे की

मागेल त्या गावांना टँकरणे पाणीपुरवठा करणे गरजेचे आहे. टँकरसाठी पंचायत समिती स्तरावर संथ गतीने कारवाई चालू आहे. मागणीची तीव्रता लक्षात घेऊन, तातडीने टँकर पुरवावे. आगामी ७ जून पर्यंत पाउस पडला नाही तर, आजच्या पेक्षा चाऱ्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनाने आजच चारा- पाण्याचे नियोजन करावे. तसेच बीड शहरात यापूर्वीच पंधरा दिवसाला पाणीपुरवठा केला जातो. यामुळे सामान्य जनतेला पिण्याचे पाण्याची साठवण करने अवघड आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात खाली गेल्याने अनेक भागातील विहीर, आड, विंधन विहिरी कोरड्या पडल्या आहेत. अनेक ठिकाणी हापशे नादुरुस्ती मुळे पाणी मिळत नाही. दुरुस्तीचे काम जलदगतीने सुरु करावे. बीड शहरात प्रभागनिहाय आवश्यक तेथे तातडीने टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा. अशी मागणी प्रशासनाला केली आहे.

# जिल्हाक्रीडा संकुलात पाणपोईची उभारणी

बीड । प्रतिनिधी

येथील माहेश्वरी प्रगती मंडळाने शहरातील गजबजणारे व खेळाडूची वर्दळ असणारे ठिकाण म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा स्टेडियम हे एकमेव असून याठिकाणी शहरातील खेळाडूंची मोठी गर्दी असते तसेच दिवसभरात हजारो लोक व्यायाम,योग साधना करण्यासाठी येत असतात. रखरखत्या उन्हात खेळाडूंची तहान भागवण्यासाठी स्टेडियम परिसरात थंडगार आर. ओ. वॉटर पाण्याची मोफत सुविधा माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने तीसरे पेयजल सुविधा करण्यात आली असून दररोज थंडगार पाणी जारचे खेळाडूंसह येणाऱ्या नागरिकांसाठी पेयजलच्या माध्यमातून वितरण केले जात आहे. मंडळाच्या या सामाजिक उपक्रमाचे प्रवाशांनी ,क्रिडारसिक व नागरिकानी कौतुक केले आणी त्यांचे भरभरून आशिर्वाद लाभत आहेत.

क्रीडा संकुलात उभारलेल्या मोफत शितल पेयजल सेवेचा क्रीडारसिकांना लाभ होत असून येथे येणाऱ्या अनेकांनी मंडळाच्या या उपक्रमाचे तोंड भरुन कौतुक केले. शितल जल पाणपोई मंगळवार दि.०७ मे रोजी सुरू करण्यात आली. माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने जुना मोंढा भागात बाहेर गावाहून येणाऱ्या नागरिकांसाठी चंपावतीरत्न स्व.श्री विठ्ठलदासजी बियाणी स्मृती पहिल्या पाणपोईची, तदनंतर स्व. भागिरथजी लाहोटी स्मृती पाणपोईची सुरुवात करण्यात आली तर बीड बस स्थानकात सुरू करण्यात आलेल्या दुसऱ्या शितल पेय जल पाणपोईसाठी बीड बस स्थानकातील अधिकारी, कर्मचारी, यांचे सहकार्य लाभत असून जिल्हा क्रीडा संकुलात सुरु करण्यात आलेल्या तिसऱ्या मोफत पेयजल सुविधेसाठी मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर जेथलिया, सचिव बद्रीनाथ मानधने, विद्यमान उपाध्यक्ष तथा निर्वाचित अध्यक्ष सुरेंद्र कासट, सहसचिव राजेंद्र चरखा, कोषाध्यक्ष भगीरथ चरखा व प्रकल्प सभापती श्री विष्णुदास बियाणी, प्रमोद मणियार, सुरज लाहोटी, डॉ राजेंद्र सारडा, सी.ए. एस. पी. लड्डा साहेब, श्नी. सी.ए. गोपाल कासट, बालाप्रसाद जाजु, गंगाबिशन करवा, प्रदीप चितलांगे, अमर डागा, बालकिसन बियाणी, इंजि. दगडूलाल बंग, जगदीश मंत्री, जगदीश सिकची, जुगलकिशोर बियाणी, मनमोहन कलंत्री, संतोष टवाणी, ॅड. ओमप्रकाश लोहिया, कैलास कलंत्री, राजेश मुंदडा, ॅड. विजय कासट, विष्णुदास तापडिया, वैद्य शिवप्रसाद चरखा, ईश्वर चरखा, रमन बाहेती इत्यादीसह माहेश्वरी प्रगती मंडळाच्या पदाधिकारी, सदस्यांचे सहकार्य लाभत आहे.

# स्व. विलासराव देशमुख यांनी राज्याला एक वेगळी ओळख निर्माण करवून दिली-राजकिशोर मोदी

## जयंतीनिमित्त राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने अभिवादन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशाचे माजी अवजड उद्योग मंत्री तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री लोकनेते स्व विलासरावजी देशमुख यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात राज्याच्या जडणघडनेला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले होते असे परखड मत अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त सहकार भवन येथे त्यांना आदरांजली वाहताना बोलत होते. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा,माजी नगरसेवक महादेव आदमाणे, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, सुनील व्यवहारे, बबन पानकोळी, सुभाष कोळी, खयामोद्दीन काझी,जमादार पठाण, गोविंद पोतंगले, विष्णू पांचाळ, गणेश मसणे, विजय रापतवार, शाकेर काझी, विशाल पोटभरे, सचिन जाधव, जावेद गवळी, मतीन जरगर,कैलास कांबळे, महेश कदम, आकाश कऱ्हाड, रोहन कुरे, विशाल जगताप, शाहिद शेख,महेश वेडे,शेख जावेद, आशिष ढेले, संतोष चिमणे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

यावेळी सर्वप्रथम स्व विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. नंतर उपस्थित सर्वांनी पुष्पांजली अर्पण करून स्व विलासराव देशमुख यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमात विशाल जगताप यांनी स्व. विलासराव देशमुख यांच्या विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या.पराभवाला न ढळता फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी कशी घ्यावी याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्व विलासराव देशमुख हे आहेत असे स्पष्ट मत विशाल जगताप यांनी मांडले. विधानसभे पाठोपाठ विधान परिषदेला देखील निसटता पराभव स्वीकारून देखील त्यांनी उमेद न सोडता पुन्हा नव्या उमेदीने सामोरे जाऊन महाराष्ट्राचे सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री म्हणून स्व विलासराव देशमुख हे राहिले होते. तेव्हा त्यांच्याकडून कुठल्याही पराभवाला कवटाळून न बसता त्याचा खिलाडू वृत्तीने स्वीकार करून पुढे गेले पाहिजे हीच शिकवण आपणास स्व विलासराव देशमुख यांच्याकडून घेण्याजोगी असल्याचे देखील विशाल जगताप यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले. लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांना आदरांजली वाहताना राजकिशोर मोदी यांनी विलासराव देशमुख यांच्या जीवनपटला उजाळा दिला. त्यांचा संपूर्ण राजकीय प्रवास आपण जवळून अनुभवल्याचे मोदी यांनी सांगितले. विलासराव देशमुख यांनी त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात बाभूळगाव ग्रामपंचायत सदस्य पदापासून केल्याचे नमूद केले. ग्रामपंचायत सदस्य, सरपंच ते राज्याचे मुख्यमंत्री असा त्यांचा प्रवास अतिशय वाखाणण्याजोगा व इतरांनी त्यातून बरच काही शिकण्यासारखेच आहे. अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देतांना विलासराव देशमुख यांनी नेहमीच झुकते माप दिल्याचे यावेळी राजकिशोर मोदी यांनी आवर्जून उल्लेखित केले. त्यांनी दिलेल्या निधीच्या बळावरच आपण अंबाजोगाई शहरात विकास कामे करू शकल्याची कबुली मोदी यांनी दिली. लातूर बरोबरच त्यांनी अंबाजोगाई शहरासाठी देखील विकासाची गंगा ज्यामध्ये तीर्थक्षेत्र विकास, वैधानिक विकास महामंडळ या व अशा विविध माध्यमातून निधी उपलब्ध करून दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी आवर्जून सांगितले. मराठवाड्याचा राजहंस काळाने आकस्मिक पणे हिरावून नेला. त्यांच्या आकस्मित जाण्याने केवळ मराठवाडाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाच्या राजकारणात कधीही न भरून निघणारी एक मोठी पोकळी निर्माण झाल्याचे याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

# आपेगाव येथे खरीप हंगाम नियोजन बैठक




अंबाजोगाई । प्रतिनिधी

येत्या खरिपात सोयाबीनवर खोडमाशी, रसशोषक किडी व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी कीड-रोगांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री शरद शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाकडून जनजागृती करण्यात येत आहे त्याचाच एक भाग म्हणून कृषी पर्यवेक्षक भागीरथ माचवे, कृषी सहाय्यक सुभाष राठोड, पंडित काकडे, अंकुश निलेवाड, कीड-रोग व्यवस्थापन तज्ञ शिवप्रसाद येळकर यांनी आपेगाव येथे कार्यशाळा घेऊन बियाणे उगवण क्षमता तपासणी व बीजप्रक्रियेचे तांत्रिक प्रशिक्षण दिले. सोयाबीनच्या बिया हाताने चोळू नये व जास्त ओले करू नये तसेच बियाण्याची टरफले निघणार नाहीत याची काळजी घ्यावी.

बीजप्रक्रिया करताना कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या लेबल क्लेम असलेल्या निविष्ठांचा वापर करावा व अनावश्यक निविष्ठांचा वापर टाळून उत्पादन खर्च कमी करावा, रुंद वरंबा सरी तंत्रज्ञानाने पेरणी करणे, शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे याची माहिती देऊन सिड ड्रमच्या सहाय्याने सोयाबीन, तूर बीजप्रक्रियाचे, हुमणी व्यवस्थापनसाठी प्रकाश सापळे करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. कार्यशाळेला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवरस्ता जेसीबीने खोदून अडवला; तहसिल प्रशासन डोके फुटण्याची वाट बघतंय का?

## पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील प्रकार -डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही शिवारातील गट क्रमांक २५४ मधिल वैद्यकिन्ही ते वैजाळा रस्त्यावरुन वैद्यकिन्ही वैजाळा शिवावरुन पश्चिमेकडे जाणारा रस्ता हरिदास सोपान खुळे आणि विक्रम किसन काळे यांनी जेसीबीच्या सहाय्याने खोदकाम करुन अडवला असुन तक्रारदार पिराजी उत्तमराव शिंदे यांच्या लेखी तक्रारीनंतर वर्षभरापूर्वी पाटोदा मामलेदार न्यायालयात तहसीलदार रुपाली चौगुले यांनी प्रतिवादी यांना वारंवार नोटीस बजावुनही न्यायालयासमोर हजर झाले नसल्याने मामलेदार अधिनियम १९०६ चे कलम ५ नुसार प्राप्त आधिकारांचा वापर करत अर्जदार पिराजी शिंदे यांचा अर्ज अंशतः मान्य करत वैद्यकिन्ही -वैजाळा दोन गावच्या शिवबांधालगतची जमिन उप अधिक्षक भुमी अभिलेख पाटोदा यांच्याकडुन मोजणी करून घेऊन हद्दी खुना निश्चित करून मंडळ अधिकारी



दासखेड यांना उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय पाटोदा यांच्या कडुन निश्चित करण्यात आलेल्या हद्दी व खुना नुसार सदरील रस्ता तात्काळ खुला करण्याचे आदेश दि.१७ मे २०२३ रोजी वर्षभरापुर्वीच दिलेले होते मात्र त्याची वर्ष उलटूनही अंमलबजावणी न झाल्याने अखेर प्रकरण हाताघाईवर आले असुन तहसिल प्रशासन नेमकं शेतकऱ्यांच्या डोके फुटाफुटीची वाट पहात आहे की काय असा प्रश्न पडला आहे. आज दि.२६ रविवार रोजी संबंधित प्रकरणी पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांना फोनवरून याची कल्पना दिली असता उद्या मंडळ अधिकारी यांना पाठवुन प्रकरणात लक्ष देतो असे आश्वासन दिले.

### ६ एक्कर ऊस रस्त्याच्या वादामुळे जागेवरच वाळला:- तक्रारदार शिंदे

आमच्या बापजाद्यापासुन हा शिवरस्ता अस्तित्वात असुन बेडुकवाडी आणि वैद्यकिन्ही येथील शेतकऱ्यांचा रहदारीचा रस्ता आहे. माझ्या रानात ६ एक्कर ऊस असुन दरवर्षी कारखाना किंवा गु-हाळाला पाठवत असतो परंतु यावर्षी वर्षभरापासून रस्त्याच्या वादामुळे जागेवरच वाळुन गेला असुन ४ लाखाचे वैयक्तिक नुकसान झाले आहे.जिल्हाधिकारी , तहसीलदार यांना वारंवार तक्रारी नंतर तत्कालीन तहसीलदार रुपाली चौगुले यांनी गेल्या वर्षी आदेश देऊनही अद्याप रस्ता खुला करून देण्यात आला नाही.

### पाटोदा तहसिल आणि भुमि अभिलेख कार्यालयातील आधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे पाणंद रस्त्यांची प्रकरणे प्रलंबित -डॉ.गणेश ढवळे

पाटोदा तालुक्यातील विविध गावांमधील शिवार रस्ते तसेच पाटोदा शहरातील पाटोदा ते चुंभळी फाटा पाणंद रस्त्यांच्या अतिक्रमण प्रश्न असो तहसिल प्रशासन आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी केवळ वेळकाढूपणा पणाची भुमिका घेताना दिसत आहेत.राजकारणी आणि धनदांडगे यांच्या हातातले बाहुले बनुन सर्वसामान्य लोकांना केवळ कार्यालयाचे हेलपाटे मारायला लाऊन कागदोपत्रीच टोलवाटोलवी करताना दिसत असुन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानंतर सुद्धा कर्तव्य बजावताना कसुर करत आहेत.कर्तव्यात कसुर करणा-या अधिका-यांवर प्रशासकीय कारवाईची आवश्यकता आहे.

# कै.सदाशिवअण्णा शेटे यांच्या पुण्यस्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ व्यापारी तथा आयुष्मान भारत - मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांचे पिताश्री कै.सदाशिवअण्णा शेटे यांच्या तृतीय पुण्यस्मरणार्थ दिंद्रुड येथे मंगळवार दिनांक २८ मे २०२४ रोजी मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गरजू व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन शेटे कुटुंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.

कै.सदाशिवअण्णा शेटे यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रत्येक वर्षी त्यांचे सुपुत्र डॉ.शिवरत्न शेटे, अॅड.किर्तिकुमार शेटे व डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. वयोवृद्धांचा सन्मान, मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार, महिलांसाठी रक्त तपासणी व उपचार आदि समाजाभिमुख कार्यक्रम दरवर्षी घेतले जातात. आजपर्यंत हजारो गरजवंतांना या शिबिराचा फायदा झालेला आहे. यंदा सदाशिव अण्णा शेटे यांच्या तृतीय



पुण्यस्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन मंगळवार दि. २८ मे २०२४ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत करण्यात आले आहे. पोलिस स्टेशन समोर असलेल्या ओमसाई शिल्प निवासस्थान, दिंद्रुड येथे संपन्न होणाऱ्या शिबिराचा गरजू व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.शिवरत्न शेटे, अॅड.किर्तिकुमार शेटे व डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने करण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमाचे चोख व्यवस्थापन करण्यासाठी गावातील तरुण, पदाधिकारी व पत्रकार यांची बैठक घेण्यात आली असून जास्तीत जास्त लाभधारकांना या शिबिराचा कसा लाभ देता येईल याबाबत नियोजन करण्यात आले आहे.


# चक्रीवादळाचा वडवणी तालुक्याला तडाखा

## चिंचोटी, पिंपरखेड, हरिश्चंद्र पिंपरीत मोठे नुकसान

**बीड । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील चिंचोटी, हरिश्चंद्र पिंपरी, पिंपरी या तिन्ही गावांना चक्रीवादळाचा मोठा तडाका बसला असून या गावातील अनेक घरावरील पत्रे उडाली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. पत्र उडण्याबरोबरच फळ फळ पिकांची झाडे उन्मळुन पडली .सोलार पंपसेट उखडले. या प्रकारामुळे शेतकरी हवालदील झाला असून पिकांचे पंचनामे करावेत अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

वडवणी तालुक्यात रविवारी चक्रीवादळाचा मोठा तडाखा बसला. या तडाख्यामध्ये पिंपरखेड ,हरिश्चंद्र पिंपरी चिंचोटी परिसरात मोठ्या नुकसान झाले. ग्रामस्थांच्या घरावरील पत्रे उडाले. याबरोबरच या चक्रीवादळाने मोठमोठी झाडे उन्मळून पडली. या परिसरात असलेल्या मोसंबी, डाळिंब , लिंबोणी आदी पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या प्रकारामुळे शेतकरी हवालदील झाला असून शेतकऱ्यांना कायम कुठल्या ना कुठल्या संकटाला सामोरे जावे लागते. पीक हातात आले की निसर्गाचा कोप होतो. अगोदरच शेतीमालाला



भाव नसल्याने शेतकरी अडचणी सापडला असून या अडचणीत चक्रीवादळाने भर टाकली आहे. फळ पिकांचे पंचनामे करून सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी केली जात आहे.

# वादळी वाऱ्याचा तडाखा;वीज पुरवठा खंडित

**परळी । प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसांपासून ४० अंशावर गेलेल्या तापमानाने परळी शहर व तालुक्यात होरपळून निघाला असताना रविवार रोजी दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला.अचानक आलेल्या या वादळी वाऱ्याने अनेकांची तारांबळ उडाली.

परळी शहर व तालुक्यात रविवार दि २६ रोजी दुपारच्या सुमारास सोसाट्याच्या वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाट होऊन हलक्या स्वरूपाचा अवकाळी बरसला.तासी ४० ते



५० किमी पेक्षा अधिक वेगाने वारे वाहून पाऊस पडत असल्याने अनेकांची तारांबळ उडाली.शहरात अनेक भागात झाडे तुटून रस्त्यावर पडली, विजेचे खाब वाकडी झाली.दुकानावरील फलक रस्त्यावर येऊन पडली तर ग्रामीण भागात अनेक शेतकऱ्यांच्या पत्र्याच्या घराचे नुकसान झाले.शहरात विजेचा तारा तुटून पडल्याने अनेक भागात वीज पुरवठा खंडित झाला होता.

# सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यामध्ये ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले यांनी आई-वडिलांच्या सेवेचे सांगितले महत्व

**चौसाळा । प्रतिनिधी**

सुलतानपूर तालुका बीड येथे गुरुवार दिनांक २३ मे रोजी वैशाख पौर्णिमे निमित्त श्री सोपानराव तुळशीराम नाईकवाडे व सौ अन्नपूर्णा सोपानराव नाईकवाडे यांनी वयाची ८४ वर्ष पूर्ण करून त्यांच्या आयुष्यामधील मोहरलेल्या एक हजार पौर्णिमा पाहिल्यामुळे सहस्त्रचंद्रदर्शन मात्र पित्र पूजन व गुरू पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



हरिभक्त परायण प्रकाश महाराज बोधले यांनी सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्याचे व मात्र पित्र पूजनाचे महत्त्व सांगून त्यांचे वृद्धापकाळात माता पित्याची सेवा करणे आवश्यक असताना स्वतःचे कुटुंब आणि स्वतःची समृद्धी याकडे मुले लक्ष देतात, त्यामुळे वृद्धाश्रमांची संख्या वाढत चालली आहे याबाबत चिंता व्यक्त केली. आई-वडिलांनी मुलांना वाढवण्यासाठी सोसलेली झीज व खाल्लेल्या खस्ता यांचे स्मरण ठेवून आई-वडिलांचा सांभाळ करावा व आई-वडिलांच्या निस्वार्थ प्रेमाची जाण ठेवावी असे नमूद केले. याप्रसंगी -पोटी भार वाहे, त्याचे सर्वस्व ही साहे ! ऐसी कळवळ्याची जाती, लाभावी न करी प्रीती ! या अभंगातून माता पित्याची महती सांगितली. या कार्यक्रमासाठी तालुका दूध संघाचे अध्यक्ष विलास बापू बडगे, प्रसिद्ध उद्योजक बलभीमराव जाहेर पाटील ,बलभीमराव कुटे, डॉक्टर पिके गुट्टे, प्रा श्रीधर ढास ,हरिभक्त परायण केशवदास वैष्णव, सरपंच लालासाहेब सालगुडे, प्रा .प्रकाश नाईकवाडे घनश्याम दळवी , एनटी वाघमारे, श्री बळीराम राऊत एसटी महामंडळाचे व्यवस्थापक श्री कचरू बोबडे व इतर मान्यवर , नातेवाईक व गावकरी हजर होते.वार्ताहर चौसाळा.- सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यामध्ये हरिभक्त परायण प्रकाश महाराज बोधले यांनी आई-वडिलांच्या सेवेचे सांगितले महत्व:- सुलतानपूर तालुका बीड येथे गुरुवार दिनांक २३ मे रोजी वैशाख पौर्णिमे निमित्त श्री सोपानराव तुळशीराम नाईकवाडे व सौ अन्नपूर्णा सोपानराव नाईकवाडे यांनी वयाची ८४ वर्ष पूर्ण करून त्यांच्या आयुष्यामधील मोहरलेल्या एक हजार पौर्णिमा पाहिल्यामुळे सहस्त्रचंद्रदर्शन मात्र ◀◀ पान ३ वर

# तलाठी अनिकेत शिरसाठ यांचा सत्कार समारंभ संपन्न

**मानूर । प्रतिनिधी**

मानूर गावचे भूमिपुत्र अनिकेत बाळासाहेब शिरसाट याची ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) या पदावर यवतमाळ येथे नियुक्ती झाली आहे. त्याच्या या नियुक्तीचा जल्लोष मानूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांनी एकत्रित येऊन शनिवार दिनांक १८ /५ / २०२४ रोजी मानूर येथे अनिकेत शिरसाट यांचा भव्य सत्कार समारंभ पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. अनिकेत हा एक शेतकरी कुटुंबातील मुलगा असून वडिलांनी काही दिवस ऊस तोडीचे काम करत अनिकेतच्या शिक्षणासाठी




लागेल तसे प्रयत्न व त्याला सहकार्य केले. आई वडिलांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शन करणारे शिक्षक यांच्यामुळेच अनिकेत शिरसाठ यांनी अतिशय कमी वयात वयाच्या २१व्या वर्षी ग्राम महसूल अधिकारी/तलाठी म्हणून पदावर विराजमान झाले. त्यांनी मानूर येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुर्ण करून पाथर्डी येथील ''सहज अभ्यासिका'' या ठिकाणी दोन वर्ष आपला अभ्यास करत जिद्द व चिकाटीने सर्वसामान्य कुटुंबातील शेतकऱ्याचा मुलगा हा मानूर गावचा पहिलाच ग्राम महसूल अधिकारी/तलाठी होण्याचा मान त्याला मिळाला. म्हणून मानूर गावाची मान उंचावली गेली त्यामुळेच भव्यदिव्य असा नागरी सत्कार संपन्न झाला. या सत्कार समारंभ प्रसंगी उपस्थित जहागिरदार मठसंस्थान मानूरचे मठाधिपती श्री ष ब्र १०८ गुरु विरुपाक्ष ◀◀ पान ३ वर

# शेतीसाठीची लाकडी अवजारे झाले कालबाह्य!

## रेडीमेड लोखंडी औजारामुळे ग्रामीण भागातील सुतार बलुतेदारी अडचणीत

**ज्योतिराम पाढरपोटे । माजलगाव**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरल्याने शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या लाकडी अवजारांचा वापर आता कालबाह्य होत आहे.सध्या लोखंडी अवजारांना शेतकऱ्यांची पसंती आहे.त्यामुळे शहरासह ग्रामीण भागात लाकडी काम करणाऱ्या सुतारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

सध्या शहरासह ग्रामीण भागात शेतकरी शेतीची कामे करण्यात व्यस्त आहेत.बहुतांश शेतकरी ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतातील पेरणीसाठी उखळणीची कामे करीत आहेत.मृग नक्षत्रात तालुक्यातील शेतकरी खरीप पेरणीच्या कामात आहेत.शेतात एक तासाचे नांगरणीसाठी छोटे ट्रॅक्टरचे १८०० तर मोठे





ट्रॅक्टरसाठी ३००० रुपये खर्च येत आहे.मागील काही वर्षांपासून लाकडी नांगर,बैलगाडीसह इतर शेती उपयोगी औजर कालबाह्य झाली आहेत.नवनवीन यंत्रामुळे पारंपरिक पद्धतीने होणारी शेती मशागत कालबाह्य होत आहे.शेती कामासाठी लागणारी सर्व लोखंडी अवजारे मिळत आहेत.लाकडी अवजारांची वाढती किंमत,मजुरी व दुरुस्तीचा खर्च अधिक असल्याने तसेच,लाकडी अवजारे दोन ते तीन वर्षांनी खराब होत असल्याने शेतकरी लोखंडी अवजारे वापरत आहेत.लाकडी अवजारांच्या तुलनेत लोखंडी अवजारे अधिक उपयुक्त ठरत आहेत.पेरणीसाठी लागणारी लाकडी नांगरही आता दिसेनासेच झाले आहेत.जनावरे सांभाळणे कठीण झाल्यानेही शेतकऱ्यांकडून लोखंडी अवजारांनाच मागणी होत आहे. शेती व्यवसायात आलेल्या अत्याधुनिक साहित्यामुळे कधी काळी शेतकऱ्यांचा आवश्यक घटक म्हणून समजल्या जाणाऱ्या लोहार, सुतार कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.रेडिमेड अवजारां मुळे ग्रामीण भागातील १२ बलुतेदारी अडचणीत आली आहे.शासनाने दखल घेऊन आर्थिक मदत द्यावी,अशी मागणी होत आहे.

### मशागतीसाठी ट्रॅक्टरचा वाढता वापर

सध्या बैलजोडींच्या किमती वाढल्या आहेत.त्यामुळे बैलजोडी खरेदी करण्यापूर्वी शेतकरी विचार करीत आहेत.त्यातच शेतात मजूर मिळत नसल्याने शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरचा अधिक वापर होत आहे.

# माजलगावात राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत यश मिळवणाऱ्या मुलींचा सत्कार

**माजलगाव । प्रतिनिधी**

पुणे येथे अखिल भारतीय सांस्कृतिक संघ यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय नृत्य स्पर्धेमध्ये माजलगावच्या मुलींनी पहिला, दुसरा, तिसरा नंबर मिळवला त्याबद्दल त्या सर्व मुलींचा सत्कार समारंभाचे आयोजन डॉ. उद्धव नाईकनवरे जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक डॉ. उद्धव नाईकनवरे, कैलास टाकणखार, सतीश काकडे , विनोद जाधव सर, अंकुश मुजमुले, संजय खरात, संतोष ललवाणी, वैभवी टाकणखार



हे उपस्थित होते. यावेळी प्रथम क्रमांक आरोही संजय खरात - लावणी, प्रथम क्रमांक स्वरा ललवाणी, रागिनी ललवानी - युगल नृत्य, द्वितीय क्रमांक-मधुरा चिंचोलकर- बॉलीवूड, तृतीय क्रमांक-संध्या अंकुश मुजमुले, चेअरमन अवार्ड-खुशी दिनेश शिंदे, लावणी ग्रुप- तृतीय पारितोषिक-समृद्धी काकडे, अंकिता साळवे, खुशी शिंदे, आरोही थोरात, संध्या मुजमुले, मधुरा चिंचोलकर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पब, बारचे होणार लाईव्ह स्ट्रीमिंग ?

## पुणे उत्पादन शुल्क विभाग मोठं पाऊल टाकण्याच्या विचारात

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात भरधाव पोर्श कारने दोघांना चिरडले होते. कल्याणीनगरमध्ये हा प्रकार घडला होता. अगोदर आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण ज्यावेळी सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाला आणि कारवाईचे रिपोर्ट समोर आले. तेव्हा संतापाची लाट उसळली. प्रकरण आपल्यावर शेकू नये म्हणून सर्वच यंत्रणा कामाला लागल्या. आता याप्रकरणात मोठी कारवाई झाली आहे. अनके अपडेटसमोर येत आहेत. त्यातच पुण्यातील उत्पादन शुक्ल कार्यालय पण एक मोठं पाऊल टाकण्याच्या विचारात आहे.



कल्याणीनगरमध्ये बेकदारपणे वाहन चालवून दोघांचा बळी घेणारा अल्पवयीन आरोपी अपघातापूर्वी एका बारमध्ये असल्याचे समोर आले. नशेच्या अंमलात त्याने कार चालवून हे कृत्य केल्याचे समोर आले. त्यानंतर सर्वच यंत्रणा खडबडून जागी झाली. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुणे कार्यालयाने पण कारवाईचा बडगा उगारला. १४ पथके स्थापन करण्यात आली. तीन ते चार दिवसांत धडक मोहिम राबविण्यात आली. आतापर्यंत जिल्ह्यातील ७१ पब-बारवर कारवाई करण्यात आली. गुन्हे दाखल करण्यात आले. बार-पब सील करून बंद करण्यात आले. या कारवाईमध्ये १ कोटी १२ लाखांचा दंड वसूल करण्यात आला.

या कारणांमुळे केली कारवाई

राज्य उत्पादन शुल्क विभागाने आज तीन मोठ्या बार, रेस्टॉरंटवर कारवाई केली. त्यांनी अनेक नियमांचे उल्लंघन केल्याचे समोर आले. रात्री मध्यरात्रीपर्यंत ते उघडे असल्याचे समोर आले. तर परवाना नसताना मद्य दिल्याचे समोर आले आहे. तर यातील अनेक रेस्टॉरंट, पब, बारने अल्पवयीन ग्राहकांना पण मद्य विक्री केल्याचे समोर आले.

लाईव्ह स्ट्रीमिंगचा पर्याय

पब आणि रेस्टॉरंटमध्ये वेबकास्टिंग आणि लाईव्ह स्ट्रीमिंग करण्याचा आमचा विचार आहे. ऑडिओ आणि व्हिडिओच्या माध्यमातून तिथली अद्ययावत माहिती आम्हाला मिळेल. कंट्रोल रुममधून अधिक प्रभावीपणे तिथे लक्ष ठेवता येईल. आमच्या अख्त्यारीत २००० बार आहेत. त्यामुळेत त्यांच्यावर लक्ष ठेवणे जिकरीचे होते, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत यांनी टाईम्स ऑफ इंडियाशी बोलताना स्पष्ट केले.

# विद्यार्थिनींचा मानसिक छळ अन् दुर्व्यवहार प्रकरणी 'एनएसयूआय' संघटनेच्या अध्यक्षाविरोधात गुन्हा दाखल




पुणेः विद्यार्थिनीचा मानसिक छळ आणि दुर्व्यवहार केल्याच्या प्रकरणात पुणे विद्यापीठ एनएसयूआय संघटनेचा अध्यक्ष अक्षय कांबळे यांना निलंबित करण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एका विद्यार्थिनीने कांबळे यांच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) यासंबंधी समाजमाध्यमाद्वारे माहिती दिली आहे. मोबाईलवर विद्यार्थिनीला मेसेज करत कांबळे याने त्रास दिला. तसेच समोर येऊन बोलण्याचे धाडस दाखवणाऱ्या विद्यार्थिनीचा मानसिक छळ केला, असा आरोप अभाविपने केला आहे.

संबंधित विद्यार्थिनीने या सर्व घटनेची पोलिसांकडे तक्रार दिली असून, पोलिस प्रशासनाने विनयभंग व विद्यार्थिनीला छळ केल्याप्रकरणी कांबळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, पीडित विद्यार्थिनीचा व्हिडिओ सध्या समाज माध्यमांवर व्हायरल झाला आहे. तिने अक्षय कांबळे विरोधात व्हिडिओ प्रसिद्ध करून कारवाईची मागणी केली आहे.

तसेच संबंधित विद्यार्थ्यांवर विद्यापीठ प्रशासनाने सुद्धा कारवाई करून सर्व विद्यार्थिनींना सुरक्षेच्या दृष्टीने आश्वस्त करावे, असे निवेदन अभाविपकडून कुलसचिवांना देण्यात आले आहे.

## गाईच्या वाहतूकप्रकरणी मंचरला एकावर गुन्हा

मंचर । प्रतिनिधी

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर मंचर (ता. आंबेगाव) येथील रसरंग हॉटेलसमोर दोन गाईंचीअवैधरित्या वाहतूक करणाऱ्या वैभव रोहिदास शिंदे (वय ३० रा.चासकमान ता. खेड) या तरुणावर मंचर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदरची कारवाई गुरुवारी करण्यात आली.

मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काळ्या-पांढऱ्या रंगाची व काळ्या रंगाची गाय घेऊन (एम.एच १२ एस.एफ १३७६) सुप्रो गाडीत वैभव जात होता. पोलिसांनी तपासणी करण्यासाठी गाडी थांबवली. सदर गायींचे वैद्यकीय अधिकाऱ्यांचे शारीरिक योग्यता प्रमाणपत्र नव्हते. गायींना चारा पाण्याची व्यवस्था नव्हती. गायी खरेदी केल्याची पावती नव्हती. सदर गाई या स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता वाहतूक करीत असताना मिळून आल्याने गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मंचर पोलिस ठाण्याचे गणेश डावखर करीत आहेत.

# नाटक-मालिका हा पूर्णवेळ व्यवसाय; शॉर्टकट नाही

## नेक्स्ट जेन करिअर फेस्ट प्रदर्शनात 'नाटक व मालिकांमधील हटके करियर' विषयावर कार्यक्रम

पुणे । प्रतिनिधी

नाटक-मालिका हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही. या क्षेत्रात पैसा, प्रसिद्धी आहे. नाटक-मालिका करणे हा पूर्णवेळ करण्याचा व्यवसाय असून यात शॉर्टकट नाही. या क्षेत्रात स्थिरावण्यासाठी प्रचंड मेहनत आवश्यक आहे, असे मत नाट्य-चित्रपट क्षेत्रातील कलावंतांनी आज व्यक्त केले.

अस्पायर नॉलेज न्ड स्किल्स, संवाद पुणे आणि हाऊस ऑफ सक्सेसतर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे मॅनेजमेंट असोसिएशन, भावार्थ यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या नेक्स्ट जेन करिअर फेस्ट प्रदर्शनातील अखेरच्या दिवशी 'नाटक व मालिकांमधील हटके करियर' या विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत, अभिनेते जयवंत वाडकर, मुग्धा गोडबोले, पुष्कर श्रोत्री, अभिनय बेर्डे हे 'आज्जीबाई जोरात' या पहिल्या एआय महानाटकातील कलाकार तसेच निर्माते दिलीप जाधव सहभागी झाले होते.

बालनाट्यापासून विद्यार्थ्यांनी सुरुवात करावी असा सल्ला देऊन जयवंत वाडकर म्हणाले, नाट्यक्षेत्रात येण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. शालेय-महाविद्यालयीन



जीवनात स्पर्धांमध्ये सहभागी झाल्यास नाट्यनिर्मितीची सर्व प्रक्रिया समजून घेता येते.

पुष्कर श्रोत्री म्हणाले, नाटकाचा आधीअभ्यास करा मग लोकांसमोर या. नाटकाची गोष्ट सांगण्याची हतोटी निर्माण झाल्यास या क्षेत्रात यश मिळू शकते.मुग्धा गोडबोले म्हणाल्या, नाटक-मालिकांमध्ये जाण्याचा मार्ग सोपा नाही. प्रसिद्धी मिळत असली तरी मेहनत ही घ्यावी लागतेच. अभिनयाबरोरब लेखन क्षेत्रही मोलाचे आहे. पण ठराविक वेळ लिखाणासाठी देतो किवा देते असे म्हणून चालत नाही. लेखनासाठीही पुरेसा वेळ द्यावाच लागतो.

'आज्जीबाई जोरात' या पहिल्या एआय महानाटकाला रसिकांची पसंती मिळाली आहे. या नाटकाच्या निर्मितीचा प्रवासही कलाकारांनी उलगडला.

निर्माते दिलीप जाधव म्हणाले, भव्यदिव्य नाट्यकृती रंगभूमीवर आणण्याचा विचार अनेक दिवसांपासून होता. या निमित्ताने एक वेगळी कलाकृती रसिकांसमोर आणली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकाला या नाट्यकृतीतून आनंद मिळत आहे याचा आनंद आहे.

'जाऊबाई ते आज्जीबाई' हा प्रवास जोरातच असल्याचे सांगून निर्मिती सावंत म्हणाल्या, या नाटकामुळे आजी घराघरात पोहोचली आहे.मुग्धा गोडबोले म्हणाल्या, कलाकाराने एकतरी तांत्रिक बाजू शिकलीच पाहिजे. लाईट, नेपथ्य याच्या जोडीने एआय या आणखी एका तांत्रिक बाजूचा समावेश झाला आहे. एआयसारख्या आधुनिक तंत्राचा वापर चांगल्या गोष्टींसाठी व्हावा, अशी अपेक्षा सर्वच कलाकारांनी व्यक्त केली. एआयच्या माध्यमातून लक्ष्मीकांत बेर्डे परत आले तर आवडेचल पण त्यांचे 'टायमिंग' कुठून आणणार असा प्रश्नही उपस्थित केला. कलाकारांशी कीर्ती जोशी यांनी संवाद साधला.

सुरुवातीस सुनील महाजन यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनाची माहिती सांगितली. डॉ. संजय गांधी, समिधा गांधी, सुनील महाजन, प्रसाद मिरासदार यांनी कलाकरांचे स्वागत केले.

# जेरबंद १० बिबट्यांचे होणार गुजरातला हस्तांतर

जुन्नर । प्रतिनिधी

''जुन्नर तालुक्यात मानव-बिबट संघर्ष क्षेत्रात जेरबंद करण्यात आलेल्या १० बिबट्यांना गुजरातमधील वनतारा रेस्क्यू सेंटरमध्ये (बचाव केंद्र) कायमस्वरूपी हस्तांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील १५ दिवसांत ही प्रक्रिया पार पडेल,'' अशी माहिती जुन्नरचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी दिली.

जुन्नर तालुक्यात काही दिवसांपूर्वी पिंपळवंडीमधील लेंडेस्थळ येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक महिला जखमी झाली होती. काळवाडी येथे एक आठ वर्षांचा मुलाचा तर पिंपरीपेंढार येथे २४ वर्षीय महिलेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. यामुळे जुन्नर तालुक्यात मागील काही दिवसांत मानव-बिबट संघर्ष तीव्र झाला आहे. बिबट्यांचा बंदोबस्त करण्याच्या पार्श्वभूमीवर वनविभाग विविध उपाययोजना राबविण्याचा प्रयत्न करत आहे. याच अनुषंगाने राज्याचे मुख्य वन्यजीव संरक्षक यांनी बिबट संघर्ष क्षेत्रातील बिबटे पकडण्याचे आदेश दिले होते. यानंतर वनविभागाने पिंपळवंडी, काळवाडी, लेंडेस्थळ, उंब्रज नं.१, उंब्रज नं.२, आदी गावांमध्ये वनविभागाने एकूण ४० पिंजरे लावले होते. या मानव बिबट संघर्ष क्षेत्रात नऊ बिबट्यांना जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे.

जेरबंद केलेल्या या बिबट्यांना सध्या माणिकडोह येथील निवारा केंद्रात ठेवण्यात आले. या निवारा केंद्रात ४४ बिबटे ठेवण्याची क्षमता आहे. सध्या या निवारा केंद्रातील बिबट्यांची संख्या आता ५४ झाली आहे, असे सातपुते यांनी सांगितले.

दिल्लीच्या सेंट्रल झू ऑथर्टीची परवानगी



राज्यात माणिकडोह (जुन्नर) व गोरेवाडा (नागपूर) या दोनच ठिकाणी रेस्क्यू सेंटर (बचाव केंद्र) आहेत. या तीनही ठिकाणी बिबटे हस्तांतर करण्यासाठी जुन्नर वनविभागाने संपर्क साधला. मात्र तिथे तेवढी क्षमता नसल्याने त्यांच्याकडून नकार आला. अखेर गुजरातमधील जामनगर येथील वनतारा रेस्क्यू सेंटरशी संपर्क साधला असता त्यांनी हे बिबटे स्वीकारण्याची तयारी दाखवली. मुख्य वन्यजीव संरक्षक व दिल्लीच्या सेंट्रल झू ऑथर्टीची जुन्नर वनविभागाने १० बिबट्यांचे हस्तांतरण करण्याची परवानगी मिळवली आहे.

## वाणिज्यच्या पदवी अभ्यासक्रमात 'एआय'

पुणे, उत्तम संभाषण कौशल्य, टॅली, डव्हान्स एक्सेल, इंटरनेट बँकींगपासून ते कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचे (एआय) विषय आता वाणिज्य शाखेतील पदवी (बी.कॉम) अभ्यासक्रमातच शिकविण्यात येणार आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एनईपी) चार वर्षाची पदवी आता अधिक कौशल्याभिमूख करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांत एनईपीची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यादृष्टीने बी.कॉम.च्या चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाला 'बी.कॉम.ऑनर्स' असे नाव देण्यात आले असून, कौशल्याभिमूख प्रात्यक्षिकांवर यात भर देण्यात आले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीने बी.कॉम.च्या चारही वर्षात शिकविल्या जाणाऱ्या अशा विषयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. उद्योग आणि आस्थापनांच्या गरजा ओळखून अभ्यासक्रमात हे बदल करण्यात आले. एका सत्राला ६० तासांचे व्यावसायिक प्रशिक्षण असणार आहे. म्हणजे रोज एक तास विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण दिले जाईल. यासाठी ३० विद्यार्थ्यांची एक बॅच तयार करण्याचा प्रस्ताव आहे. प्राध्यापकांचे कौशल्य अद्ययावत करण्यासाठी विद्यापीठाच्यावतीने प्रशिक्षण घेण्यात येत असून, दहा वरिष्ठ प्राध्यापकांची एनईपी कौन्सिलर म्हणून नियुक्ती केली आहे. महाविद्यालयाच्या गरजेनुसार त्यांना एनईपीसंदर्भात प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# विश्व हिंदू परिषदेच्या नव्या कार्यकारणीची घोषणा

मंचर । प्रतिनिधी

विश्व हिंदू परिषदेच्या पुणे ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी प्रशांत काळे व जिल्हा उपाध्यक्षपदी डॉ. रश्मी घोलप यांची निवड केली, अशी माहिती प्रसिद्धीप्रमुख हेमंत लोखंडे यांनी दिली.राजगुरुनगर (ता.खेड) येथील वसतिगृहात विश्व हिंदू परिषद पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या नव्या कार्यकारणीची घोषणा झाली. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची नावे : जिल्हामंत्री- संतोष खामकर, जिल्हासहमंत्री- महेंद्र असवले व सुमीत शिंनगारे, बजरंग दल संयोजक - गणेश रौंधळ, मातृशक्ती संयोजिका- वैशाली लांडगे, दुर्गा वहिनी संयोजिका- अर्पिता फाकटकर, गोरशा प्रमुख- योगेश शेटे, प्रसारप्रचार प्रमुख- हेमंत लोखंडे, सेवाप्रमुख- सचिन शेलार, विशेष संपर्कप्रमुख- विशाल बाणखेले, विधी प्रमुख- ॲड. पवन भंडारी, सत्संग प्रमुख- प्रतीक चिखले, सामाजिक समरसता प्रमुख- सुशील वाडेकर, कोषाध्यक्ष- गणेश महाराज भोर, निधी प्रमुख- अमित भेगडे, धर्माचार्य संपर्कप्रमुख- गोपीचंद महाराज कचरे, धर्म प्रसारप्रमुख- हर्षवर्धन कुऱ्हे, बजरंग दल सहसंयोजक- प्रशांत खैरे, अजिंक्य तारू, रोहन निकटे, अवधूत चौधरी, दुर्गा वहिनी सहसंयोजिका- कावेरी भोर, मातृशक्ती सहसंयोजिका- मनीषा चासकर, सहसत्संग प्रमुख समाधान गायकवाड, विशेष सहसंपर्कप्रमुख प्रवीण फाकटकर, सहनिधी प्रमुख- सदानंद मारणे, सहसामाजिक समरसता प्रमुख- विजय मरगळे, सहगोरक्ष प्रमुख-दीपक गावडे, सहगोरक्ष प्रमुख- निखिल पिंजण, सहधर्मप्रसार प्रमुख- दत्तात्रेय गरुड, सहकोशाध्यक्ष- मोरेश्वर पोकळे, सहप्रचार प्रसार प्रमुख विकास काळोखे.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

पारगाव : पारगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका गावात अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याची घटना १८ जानेवारी २०२४ ते ७ मे २०२४ दरम्यान घडली आहे. या अल्पवयीन मुलीने पारगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. गोकूळ राठोड (रा. धुळे) याच्यावर पारगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पारगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गोकूळ राठोड याने १८ जानेवारी २०२४ ते ७ मे २०२४ या काळात पीडित मुलगी घरी एकटीच असताना तिला कॅडबरी खाण्यासाठी देऊन म्हणाला की, 'तू मला खूप आवडतेस, तुझ्यासोबत मला लग्न करायचे आहे,' असे बोलून बळजबरीने तिच्याबरोबर शरीर संबंध ठेवले. त्यानंतरही वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. 'याबाबत घरच्यांना सांगितले, तर तुला व तुझ्या आई-वडिलांना मारून टाकेल' असा दम दिला. याबाबत अल्पवयीन मुलीने पारगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पुढील तपास पारगाव पोलिस करत आहेत.

# डॉ. अरविंद बी. तेलंग इन्स्टिटयूटला नॅक समितीची भेट

पिंपरी । प्रतिनिधी

चिंचवड येथील कॅम्प एज्युकेशन सोसायटी संचलित डॉ. अरविंद बी. तेलंग इन्स्टिटयूटला राष्ट्रीय मुल्यांकन व मानांकन परिषदेने (नॅक)

भेट देऊन तपासणी केली. दोन दिवस झालेल्या या तपासणी समितीत नॅक समितीचे चेअरमन डॉ. देवी प्रसाद मिश्रा, सदस्य समन्वयक डॉ. अजय वाघ व सदस्य डॉ. शकुंतला सॅम्युएल्सन यांचा समावेश होता.

दोन दिवस झालेल्या दुसऱ्या तपासणीत राष्ट्रीय मुल्यांकन व मानांकन परिषदेमध्ये (नॅक) असलेल्या अधिकाऱ्यांकडून स्वयंपरीक्षण अहवालानुसार महाविद्यालयाचे कसून मूल्यांकन करण्यात आले.त्यांनी महाविद्यातील सर्व विभागांच्या



शैक्षणिक उपक्रमांची माहिती व कागदपत्रे तपासणी करून कामकाजाची पाहणी करून केलेल्या कामाची प्रशंसा केली. यामध्ये विद्यार्थ्यांना परिणाम आधारित शिक्षण दिले जाते का यासाठी कठोर तपासणी करण्यात आली. याप्रसंगी समितीने महाविद्यालयातील सर्व विषयांची विभागनिहाय पाहणी केली तसेच पायाभूत सुविधा, ग्रंथालय, आयसीटी सुविधा, ट्रैनिंग अँड प्लेसमेंट विभाग आदींची पाहणी केली.

या समितीसाठी कॅम्प एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष वालचंद डी. संचेती, सचिव बाबुराव वि. जावळेकर , खजिनदार सुभाष डी. अगरवाल, सदस्य इम्तियाज मुल्ला, सदस्य डॉ. मिलिंद तेलंग, प्राचार्य डॉ. अजयकुमार राय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचे डीन डॉ. प्रमोद पाटील, पुण्यातील अमेनोरा द फर्न या हॉटेल्सचे महाव्यवस्थापक अमित कुमार शर्मा तसेच द कॉनरॉड या हॉटेलचे महाव्यवस्थापक अभिषेक सहाय यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीयन पारंपारिक पोशाख परिधान करून सर्व सदस्यांचे स्वागत केले तसेच पारंपारिक पध्दतीचे जेवण बनविले. या सगळ्याचे नॅक समितीने तसेच उपस्थित सर्व सदस्यांनी खूप कौतुक केले. नॅक समितीचे चेअरपर्सन यांनी आपल्या एक्सिट मीटिंग मध्ये महाविद्यालयाचे तसेच विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हॉटेल मॅनेजमेंटमध्ये शिक्षण देणारे डॉ. अरविंद बी. तेलंग हे महाविद्यालय पुणे जिल्ह्यात सर्व सोयी सुविधायुक्त चांगले ज्ञान आणि कौशल्य मिळविण्यासाठी समग्र शिक्षण पद्धती असलेले तसेच उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग, १००% प्लेसमेंट रेकार्ड, १००% निकाल असलेले एक चांगले महाविद्यालय आहे असेही ते म्हणाले. त्यांनी महाविद्यालयाला तसेच विद्यार्थ्यांना पुढील चांगल्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

एक्सिट मीटिंगच्या शेवटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजयकुमार राय यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती यांचे वेळोवेळी सहकार्य व बहुमूल्य मार्गदर्शन या नॅक समितीसाठी मिळाले असल्याचे सांगून आभार व्यक्त केले.

# अडीच कोटी फसवणूक प्रकरणी बिल्डर गणेश कोंढरे यास पोलीस कोठडी

पुणे - सुभाष काशिनाथ सूर्यवंशी यांना बिल्डर नामे गणेश कोंढरे यांच्याकडून आंबेगाव निपाणी वस्ती जांभुळवाडी रोड यांच्याकडून प्लॉटिंग संदर्भात माहिती मिळाली. त्यावेळी सुभाष सूर्यवंशी यांनी सदर फ्लॉटमध्ये तीन गुंठे क्षेत्रफळ असलेला प्लॉट बुकिंग करण्याचे ठरवले त्यामध्ये एक गुंठ्याचा ९,००,०००/- प्रमाणे तीन गुंठेतील २७,००,०००/- असा व्यवहार ठरला होता. दिनांक १७/०१/२०२१ रोजी ठरल्याप्रमाणे सुभाष सूर्यवंशी यांनी २२,०००/ - रोख स्वरूपात देऊन प्लॉटची बुकिंग केली व त्यांना त्याबाबत पावती मिळाली. त्यानंतर सुभाष सूर्यवंशी यांनी गणेश कोंढरे जी के बिल्डर्स अँड डेव्हलपर्स या नावाने आजतागायत रक्कम २२,००,०००/- प्लॉटचे खरेदी करता दिली. त्यानंतर सुभाष सूर्यवंशी यांनी प्लॉट देण्यासाठी गणेश कोंढरे त्याबाबत जाब विचारला असता त्यांनी अरेरावीची भाषा वापरून प्लॉट देण्यास नकार दिला व गणेश कोंढरे यांनी सुभाष सूर्यवंशी यांचे नावे धनादेश दिला परंतु तो जमा झाला नाही. तसेच सदर बिल्डर गणेश कोंढरे यांनी सुभाष सूर्यवंशी व इतर २२ गुंतवणूकदाराची एकूण २,७१,९८,०००/- रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास भारती विद्यापीठ पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. बिल्डर गणेश कोंढरे याला २५/५/२४ रोजी न्यायालयात हजर केले असता पोलिसांनी आरोपीची १० दिवस पोलिस कोठडी मागितली होती परंतु बिल्डर गणेश कोंढरे यांचे वकिल ड. अभिजित सोलनकर यांचा सर्व पुरावे हे कागदोपत्री उपलबद्ध असल्याचा युक्तिवाद मा. न्यायाधीश एस.जी. बर्डे यांनी मान्य करून त्यांना ३१/५/२४ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलेली आहे. याप्रकरणी ड. अभिजित सोलनकर व ड. सागर शिंदे यांनी काम पाहिले.